कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
JUSTICE FOR ALL
ADVO CATE
संपर्क
अँड . सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

बहुजन सौरभ

शनिवार, 30 मे २०२६
Saturday, 30 May 2026

वर्ष : ६ | अंक : १५०
Year : 6 | Issue : 150

दैनिक
Daily

किंमत : ₹ ५/-
Rate: Rs. 5/-

दि. 30 मे 2026



१९२०- नागपूर येथे छत्रपती शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या उपस्थितीत धुम्रपान निषेध.
१९३६- स्वतंत्र मजूर पक्षाच्या आमदारांच्या अभिनंदनासाठी परळ मैदान येथे बाबासाहेबांची सभा आणि अभिनंदन पत्र भेट.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

पेपरफुटीवरून सर्वोच्च न्यायालयाने NTA ला फटकारले

नवी दिल्ली : नीट (NEET) परीक्षा पेपर फुटीच्या प्रकरणात सीबीआयने आतापर्यंत अटक केलेल्यांची संख्या ११ च्याही पुढे गेली आहे. सीबीआयकडून नीट पेपरफुटी प्रकरणात सखोल चौकशी केली जात आहे. यंदा जवळपास २२.७ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी ही नीटची परीक्षा दिली होती. पण पेपरफुटीच्या घटनेमुळे केंद्र सरकारने ही परीक्षा रद्द केली. आता २१ जून रोजी ही नीटची पुनर्परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यामुळे या २२ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना पुन्हा नीट (NEET) परीक्षा द्यावी लागणार आहे.

दरम्यान, या नीट (NEET) परीक्षा पेपर फुटीच्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर आज (२९ मे) सुनावणी पार पडली आहे. या सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने नीट (NEET) परीक्षा पेपरफुटीवरून एनटीएला फटकारलं आहे. 'यूपीएससीमध्ये कधी पेपरफुटी झाली नाही, त्यांच्याकडून धडा घ्या', असं सांगत सर्वोच्च न्यायालयाने एनटीएला फटकारले आहे.





केंद्र सरकारने न्यायालयाला काय सांगितले?

केंद्र सरकारच्यावतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयाला सांगितल की, 'प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे स्वतः या प्रकरणावर लक्ष ठेवून आहेत.' सर्वोच्च न्यायालयाने नीट परीक्षेचा पेपर रद्द झाल्याबद्दल चिंता व्यक्त केली. तसेच आता ही परीक्षा योग्यरित्या पार पाडली जाईल याची खात्री करण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार, अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी फेरपरीक्षेपूर्वी अनेक सुरक्षा उपाययोजना लागू केल्या जातील.

सर्वोच्च न्यायालयाने काय म्हटले?

नीट (NEET) परीक्षा पेपर फुटीच्या प्रकरणावरून सर्वोच्च न्यायालयाने नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) ला विचारलं की, देखरेख यंत्रणा आणि पर्यवेक्षण समित्या अस्तित्वात असूनही एवढी मोठी पेपर फुटीची घटना कशी घडू शकते? असा सवाल न्यायालयाने विचारला. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने यूपीएससीशी तुलना करत न्यायालयाने म्हटलं की, "देशाच्या या प्रमुख नागरी सेवा परीक्षेत अशा पेपर फुटीच्या घटना कधीही घडल्या नाहीत, त्यामुळे त्यांच्याकडून नॅशनल टेस्टिंग एजन्सीला धडा घेण्याची गरज आहे."

नीटच्या पुनर्परीक्षेची तारीख काय?

एनटीएन नीट पुनर्परीक्षेची तारीख जाहीर केलेली आहे. त्यानुसार येत्या २१ जून रोजी रविवारी नीटची पुनर्परीक्षा पार पडणार आहे. परीक्षेची तारीख जाहीर झाल्यामुळे आता विद्यार्थ्यांना त्यादृष्टीने अभ्यासाचं नियोजन करावं लागणार आहे. तसेच एनटीएने विद्यार्थी आणि पालकांना एक महत्त्वाचं आवाहनही केलेलं आहे. परीक्षेबाबतच्या कोणत्याही माहितीसाठी केवळ नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या अधिकृत माध्यमांवरच विश्वास ठेवावा असे स्पष्ट करण्यात आले आहे.

विधान परिषदेच्या १५ जागांवर मविआचे एकमत

काँग्रेस आठ, उद्धवसेना चार आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्ष ३ जागांवर लढणार

मुंबई : राज्यातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी होत असलेल्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचे १७ पैकी १५ जागांवर एकमत झाले आहे. यामध्ये काँग्रेस आठ, उद्धवसेना चार आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्ष ३ जागांवर लढणार आहे. तर उर्वरित दोन जागांवरही लवकरच निर्णय होईल, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली.



काँग्रेस पक्ष विधान परिषदेच्या चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा, अमरावती, अहिल्यानगर, सोलापूर, धाराशिव-लातूर-बीड या जागा लढवणार आहे तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष पुणे, ठाणे आणि सांगली-सातारा या ३ जागा आणि उद्धवसेना रायगड, जळगाव, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजीनगर या ४ जागा लढवत आहे, असे हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी सांगितले.

विधान परिषदेच्या जागा वाटापासंदर्भात महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये पार पडली. या बैठकीला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (श.प.) कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे, शिवसेना (उबाठा) नेते खासदार अनिल देसाई, आमदार अंबादास दानवे, आमदार मिलिंद नार्वेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अदिती नलावडे, माजी आमदार मिलिंद अण्णा कांबळे उपस्थित होते. बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी बोलतांना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, विधान परिषदेच्या निवडणुकीतही सत्ताधारी पक्षाकडून पैशाचा वापर मोठ्या प्रामणावर सुरु आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर मतदारसंघासाठी खासदार प्रणिती शिंदे, सांगली-सातारासाठी माजी मंत्री डॉ. विश्वजित कदम, पुणेसाठी विधान परिषदेतील गटनते सतेज ऊर्फ बंटी पाटील, उत्तर महाराष्ट्रातील अहिल्यानगरसाठी ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, जळगावसाठी खासदार चंद्रकांत हंडोरे, नाशिकसाठी माजी मंत्री के.सी. पाडवी, मराठवाड्यातील नांदेडसाठी खासदार रविंद्र चव्हाण, धाराशिव-लातूर-बीडसाठी माजी मंत्री आमदार अमित देशमुख, परभणी हिंगोलीसाठी खासदार डॉ. कल्याण काळे, छत्रपती संभाजीनगर-जालनासाठी माजी खासदार तुकाराम रेंगे पाटील, विदर्भातील यवतमाळसाठी माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, भंडारा-गोंदियासाठी माजी प्रदेशाध्यक्ष आ. नाना पटोले, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोलीसाठी विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, अमरावतीसाठी माजी मंत्री यशोमती ठाकूर, नागपूर पोटनिवडणुकीसाठी माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, कोकण विभागातील ठाणे मतदार संघासाठी माजी मंत्री नसिम खान, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्गसाठी मुझफ्फर हुसेन यांना जबाबदारी देण्यात आलेली आहे.

महत्वाच्या बातम्या

रोमानियन अपार्टमेंटवर रशियन ड्रोन कोसळला

नवी दिल्ली : युक्रेनच्या सीमेजवळ, पूर्व रोमानियातील गलाटी येथे, ड्रोन कोसळल्याने झालेल्या स्फोटामुळे आणि आदळल्याने लागलेल्या आगीमुळे एका इमारतीच्या छताला आग लागली. युक्रेनवरील रात्रीच्या हल्ल्यादरम्यान पूर्व रोमानियामध्ये एक रशियन ड्रोन एका अपार्टमेंट इमारतीवर कोसळला, ज्यात दोन जण जखमी झाले आणि या घटनेचा नाटो व युरोपीय नेत्यांनी तीव्र शब्दांत निषेध केला. रोमानियाच्या युक्रेन सीमेजवळील गलाटी शहरात ड्रोनने एका निवासी इमारतीला धडक दिल्याने आग लागली आणि त्यात एक १४ वर्षांचा मुलगा व एक ५३ वर्षीय महिला जखमी झाली, असे वृत्तसंस्था एएफपीने कळवले आहे.रोमानियन अधिकाऱ्यांनी सांगितले की, युक्रेनवरील रशियन हल्ल्यांच्या ताज्या लाटेदरम्यान ड्रोन रोमानियन हवाई हद्दीत घुसले होते आणि कोसळण्यापूर्वी रडारद्वारे त्याचा मागोवा घेण्यात आला होता.

होर्मुझ खुला करण्यासाठी Quad देश एकवटले

नवी दिल्ली : पश्चिम आशियातील वाढता तणाव पाहता भारत आणि अमेरिकेसह क्वाड देशांनी जागतिक व्यापार वाचवण्यासाठी पुढाकार घेतला आहे. होर्मुझ सामुद्रधुनीसारखे जगातील प्रमुख जलमार्गावरील व्यापारी वाहतूक कुठल्याही किंमतीत रोखली जाऊ शकत नाही असं क्वाड देशांनी स्पष्ट केले. जर कुणी या जहाजांना रोखण्याचा प्रयत्न करत असेल तर चारही देश एकत्रित मिळून त्याचा विरोध करतील. भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी नवी योजना तयार करण्यात येणार आहे. त्यात तंत्रज्ञान, रणनीती, बाजार विश्लेषणावर काम केले जाईल. आपत्कालीन स्थितीला तोंड देण्यासाठी संयुक्त अभ्यास करणे, सामरिक तेलसाठे मजबूत करणे हे त्यातील एक मुख्य उद्दिष्ट आहे. इंडो-पॅसिफिक प्रदेशात ऊर्जा सुरक्षा वाढवण्यासाठी सहकार्य सुरू राहील. हा समन्वय सुधारण्यासाठी क्वाड फ्यूल सिक्युरिटी फोरम लवकरच स्थापन केला जाईल. हा फोरम उच्च-स्तरीय चर्चा आणि सहकार्याला चालना देईल. क्वाड देशांच्या संयुक्त निवेदनात होर्मुझच्या सामुद्रधुनीसारख्या महत्त्वाच्या सागरी मार्गांमधून व्यापारी जहाजांची अखंड वाहतूक सुनिश्चित करण्याचा एक मोठा संकल्प करण्यात आला आहे.

उन्हाच्या तीव्र तडख्यामुळे संत्रा बागा संकटात

परतवाडा : विदर्भातील विदारक उन्हाचा चटका आता अमरावती जिल्ह्यातील संत्रा बागांना सोसावा लागत आहे. गेल्या आठवडाभरापासून जिल्ह्यातील तापमान सातत्याने ४५ ते ४६ अंश सेल्सिअसच्या पार गेल्याने मुख्य नगदी पीक असलेला संत्र्याचा 'आंबिया बहर' पूर्णपणे धोक्यात आला आहे.विशेषतः अचलपूर तालुक्यातील ग्रामीण भागात स्वतः मोठ्या प्रमाणात संत्रा उत्पादक शेतकरी असून, कडक उन्हामुळे झाडांवरील ताण वाढल्याने ग्रामीण भागातील बागांमध्ये मोठ्या प्रमाणावर फळगळ सुरू झाल्याचे पहायला मिळत आहे. यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी पुन्हा एकदा हवालदिल झाला आहे.अचलपूर तालुक्यासह चांदूर बाजार, वरूड, मोर्शी, अंजनगाव सुर्जी, तिवसा, धामणगाव रेल्वे आणि चांदूर रेल्वे या परिसरामध्ये संत्र्याचे मोठे उत्पादन घेतले जाते. मात्र, मे महिन्याच्या अखेरीस तापमानाचा पारा कमालीचा वाढल्याने अचलपूरच्या ग्रामीण भागातील संपूर्ण संत्रा पट्टधाला याचा मोठा फटका बसला आहे

पंजाबमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपाचा धुव्वा

चंदिगड : शेतकरी आंदोलन आणि अकाली दलासोबत असलेली मैत्री तुटल्यापासून पंजाबमध्ये अस्तित्वाची लढाई लढत असलेल्या भाजपाला आज लागलेल्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मोठा धक्का बसला आहे. या निवडणुकीत सत्ताधारी आम आदमी पक्षाने सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत. तर काँग्रेस दुसऱ्या स्थानी राहिली. अकाली दल तिसऱ्या क्रमांकावर राहिला असून, भाजपाला इतर विजयी उमेदवारांपेक्षाही कमी जागा मिळाल्या आहेत.शेतकरी आंदोलनानंतर पक्षाविरोधात निर्माण झालेली नाराजी, स्थानिक प्रभावी नेतृत्वाचा अभाव यामुळे राज्यात कमकुवत झालेल्या भाजपाला स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत अपेक्षित कामगिरी करता आली नाही.

सीबीएसईची पुनर्मूल्यांकन आणि पडताळणी प्रक्रिया १ जूनपासून



नवी दिल्ली : CBSE इयत्ता १२ वी पुनर्मूल्यांकन २०२६: CBSE बोर्डाने इयत्ता १२ वीच्या पुनर्मूल्यांकन आणि पडताळणी प्रक्रियेसंदर्भात एक महत्त्वाचे अपडेट जारी केले आहे. बोर्डाने म्हटले आहे की, विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांच्या पडताळणी आणि पुनर्मूल्यांकनासाठी 'निकालोत्तर उपक्रम' (Post-Results Activities) पोर्टल आता १ जून २०२६ पासून सुरू केले जाईल.यापूर्वी, सीबीएसईने म्हटले होते की अर्ज पोर्टल शुक्रवार, २९ मे पर्यंत सुरू होण्याची अपेक्षा आहे. तथापि, मंडळाने आता स्पष्ट केले आहे की पारदर्शक आणि त्रुटी-मुक्त प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी पोर्टल १ जूनपासून सुरू केले जाईल. सीबीएसईच्या मते, मूल्यांकन प्रक्रियेत सर्वोच्च दर्जा कायम राहावा आणि सर्व आवश्यक नियमांचे पालन व्हावे, हे सुनिश्चित करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना कोणत्याही तांत्रिक अडचणीशिवाय त्यांच्या उत्तरपत्रिकांच्या पडताळणी आणि पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करता यावा, अशी मंडळाची इच्छा आहे. प्रक्रियेसंदर्भात कोणत्याही विद्यार्थ्याला काही प्रश्न किंवा शंका असल्यास, ते 1800 11 8004 या क्रमांकावर CBSE टेलि-समुपदेशन हेल्पलाइनशी संपर्क साधू शकतात. विद्यार्थी त्यांच्या तक्रारी किंवा प्रश्न resultcbse2026@cbseshiksha.in या ईमेल आयडीवर देखील पाठवू शकतात.

विद्यार्थी आणि पालकांच्या तक्रारींनंतर, CBSE ने निकालानंतरच्या सेवांसाठीच्या शुल्कातही सुधारणा केली आहे. या सुधारणेनुसार, विद्यार्थ्यांना स्कॅन केलेल्या प्रती मिळवण्यासाठी आणि गुण पडताळणीसाठी प्रति विषय *'100 शुल्क भरावे लागेल. पुनर्मूल्यांकनाचे शुल्क प्रति प्रश्न आकारले जाईल, जे प्रति प्रश्न'* 25 निश्चित करण्यात आले आहे. मंडळाने हे देखील स्पष्ट केले आहे की, पुनर्मूल्यांकनानंतर विद्यार्थ्यांचे गुण वाढल्यास, त्याच्याकडून आकारलेले शुल्क परत केले जाईल.

माजी मुख्यमंत्री विजयन यांच्या निवासस्थानी ईडीच्या धाड



तिरुवनंतपुरम : केरळमध्ये माजी मुख्यमंत्री पिनारयी विजयन यांच्या निवासस्थानावर ईडीने टाकलेल्या छाप्यानंतर उसळलेल्या गदारोळावर मुख्यमंत्री सतीश चंद्र यांनी कठोर भूमिका घेतली आहे. तपास यंत्रणेच्या अधिकाऱ्यांवरील हल्ले कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत आणि हा एक गंभीर गुन्हा आहे, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्टपणे सांगितले. ते पुढे म्हणाले की, लोकशाहीत प्रत्येकाला निषेध करण्याचा अधिकार आहे, परंतु कोणालाही कायदा हातात घेण्याची परवानगी नाही.

सतीसन यांनी सांगितले की, राज्य सरकार कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे आणि हिंसाचारात सहभागी असलेल्यांवर कठोर कारवाई केली जाईल. या संपूर्ण घटनेमुळे केरळच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. मात्र, विजयन यांनी काँग्रेस पक्षावरही हल्ला चढवला. ते म्हणाले की, जेव्हा केंद्र सरकार आपल्या नेत्यांविरुद्ध अंमलबारी संचालनालयाचा (ईडी) वापर करते, तेव्हाच काँग्रेस पक्ष त्याला विरोध करतो. त्यांनी काँग्रेस पक्षाची भूमिका 'संकीर्ण' असल्याचे म्हटले आणि विरोधी पक्षांनी एकत्र येऊन अशा कारवाईला विरोध केला पाहिजे, असे सांगितले.

विजयन यांनी दावा केला की, जेव्हा दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर कारवाई करण्यात आली, तेव्हा काँग्रेसने प्रश्न विचारला की त्यांना अटक का केली जात नाही. नंतर, जेव्हा गुन्हा दाखल झाला, तेव्हा काँग्रेसने आनंद व्यक्त केला. ते म्हणाले की, तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन आणि केजरीवाल यांनी त्यांच्यावरील ईडीच्या कारवाईवर टीका केली, पण काँग्रेस अजूनही आपली भूमिका बदलत नाही.



विषारी दारू प्यायल्याने १२ जणांचा मृत्यू

मुंबई : पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये विषारी दारू प्यायल्याने बारा जणांचा मृत्यू झाला आहे. पिंपरी चिंचवडच्या फुगेवाडीत सात जणांचा, तर पुण्यातील हडपसरमध्ये पाच जणांचा मृत्यू झाला आहे. तीन जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने संयुक्त कारवाई करून मुख्य पुरवठादार योगेश वानखेडे याच्यासह आठ आरोपींना अटक केली आहे. मृतांच्या शवविच्छेदन अहवालाची प्रतीक्षा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत पत्रकारांना सांगितले की, विषारी दारूच्या पुरवठ्यामागील नेटवर्क ओळखण्यात आले आहे. पोलीस आणि उत्पादन शुल्क विभाग एकत्रितपणे काम करत असून लवकरच आणखी अटक करण्यात येतील. राज्य उत्पादन शुल्क आयुक्त अतुल कानाडे यांनी सांगितले की, फुगेवाडी आणि हडपसरमध्ये दारू पुरवठ्यातील मुख्य आरोपी योगेश वानखेडे याला ताब्यात घेऊन पिंपरी चिंचवड पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. पिंपरी चिंचवडचे डीसीपी संदीप अटोले यांनी सांगितले की, फुगेवाडीत सात जणांचा मृत्यू झाला आहे. तिघांवर उपचार सुरू आहेत. दरम्यान, हडपसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय मोगले यांनी तेथे पाच जणांच्या मृत्यूची पुष्टी केली. अधिकाऱ्यांच्या मते, मृत्यूचे नेमके कारण निश्चित करण्यासाठी शवविच्छेदन आणि चाचणी अहवालाची प्रतीक्षा आहे.

'नोंदीनुसार सरसकट ५८ लाख कुणबी प्रमाणपत्रे द्या' : जरांगे

जालना : शनिवार, ३० मेपासून सुरू होणाऱ्या रखरखत्या उन्हात 'विना मंडप, विना पाणी' आमरण उपोषणाच्या पार्श्वभूमीवर अंतरवाली सराटीत शुक्रवारी सायंकाळी प्रचंड राजकीय थरार पाहायला मिळाला. उपोषण रोखण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे दूत म्हणून मराठा उपसमितीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार प्रसाद लाड यांच्यासोबत मनोज जरांगे पाटील यांची हाय-व्होल्टेज चर्चा झाली. मात्र, या चर्चेत जरांगे पाटील कमालीचे आक्रमक झाले. *'तुम्हाला काय करायचे ते करा, मी उद्या उपोषणावर बसणारच,'* असा कडक पवित्रा घेत जरांगे यांनी सरसकट ५८ लाख कुणबी प्रमाणपत्रे देऊन ती वैध घोषित करण्याची मागणी थेट विखे पाटलांच्या तोंडावर ठोकली. चर्चेदरम्यान मनोज जरांगे यांनी थेट मुख्यमंत्री कार्यालयावर गंभीर आरोप केला. *'राज्यात ५८ लाख नोंदी सापडल्या असताना अचानक मुख्यमंत्री कार्यालयातून ही कुणबी प्रमाणपत्रे वाटप थांबवण्याचे तोंडी आदेश कुणी दिले? आमच्या लेकरांच्या बाबत एक न्याय आणि दुसऱ्यांच्या बाबत वेगळा न्याय, असे का सुरू आहे?'* असा सवाल जरांगे यांनी उपस्थित केला. यावर मंत्री विखे पाटील यांनी 'सरकार तुमच्या सर्व मागण्यांवर सकारात्मक आहे' असे म्हणत जरांगेंना शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, जरांगे यांनी १९९४ च्या जीआरमधील विसंगती आणि हैदराबाद गॅझेटच्या मुद्द्यावरून सरकारची कोंडी केली. जरांगे पाटील यांनी गॅझेटच्या अंमलबजावणीवर कडक आक्षेप घेतला. ते म्हणाले, 'आम्ही रात्रीचा दिवस करून ज्या कुणबी नोंदी शोधल्या, त्यावर सरकारने आणून हैदराबाद गॅझेट चिपकवले. आता या गॅझेटनुसार अधिकारी राज्यातील एकाही मराठ्याचा अर्ज स्वीकारत नाहीत. या हैदराबाद गॅझेटला मुंबई उच्च न्यायालयात नेमका विरोध कुणी केला, हे आम्हाला चांगलं माहीत आहे.' या वेळी जरांगे यांनी कडक शब्दात मागणी केली की, **'मला आधी त्या ५८ लाख नोंदींची संपूर्ण अधिकृत माहिती द्या आणि मराठवाड्याच्या सर्व मराठ्यांना तातडीने कुणबी प्रमाणपत्रे देऊन टाका, जेणेकरून गरीब विद्यार्थ्यांना त्याचा तात्काळ फायदा होईल.'**



चर्चेचा विस्कळीत होत असलेला ताळमेळ पाहता मंत्री विखे पाटील यांनी प्रशासकीय अडचण पुढे केली. 'छत्रपती संभाजीनगरचे नवीन विभागीय आयुक्त नुकतेच रुजू झाले आहेत, त्यांना या सर्व प्रक्रिया समजून घेण्यासाठी आणि अंमलबजावणीसाठी थोडा वेळ द्यावा,' अशी विनंती विखे पाटलांनी केली. यावर जरांगे यांनी मवाळ होत, 'ठीक आहे, मी प्रशासनाला ४ ते ५ महिन्यांचा वेळ देतो, पण म्हणून माझे उद्याचे उपोषण थांबणार नाही. ज्यांना प्रमाणपत्र पाहिजेत ते अधिकारी दारात येऊन देतील, तोपर्यंत माझी लढाई उन्हातच सुरू राहील,' असे सांगत शिष्टमंडळाला रिकाम्या हाती परत पाठवले.

PROPERTY FOR RENT/ LEASE
AVAILABLE ON RENT/ LEASE AT PRIME LOCATION
COMMERCIAL PROPERTY
Total Plot Area: 50,000 Sq.Ft.
Constructed Area: 30,000 Sq.Ft.
LOCATION: WELA (HARI), SHANKARPUR ROAD
♦ IDEAL FOR ♦
• Hostel/ Student Accommodation • New College/ Educational Institution • Residential College Campus
• Car/ Motorcycle Showroom • Warehouse / Godown
• Supermarket (D-Mart Type)
♦CONTACT♦
DR. KAMBLE: 9422539451

“ अनुभव हा जगातील, सर्वात मोठा शिक्षक आहे. ”

बहुजन सौरभ संपादकीय

जनतेच्या सहनशीलतेचा अंत कधी होणार?

भारतीय जनतेचा एक विशेष गुणधर्म जगभरात ओळखला जातो, तो म्हणजे तिची सहनशीलता. अन्याय, भ्रष्टाचार, महागाई, बेरोजगारी, प्रशासनाची उदासीनता, राजकीय फसवणूक आणि सामाजिक विषमता यांचा सामना करूनही भारतीय जनता संयमाने जगत राहते. पण प्रश्न असा आहे की, या सहनशीलतेचीही काही मर्यादा आहे का? आणि असेल तर जनतेच्या सहनशीलतेचा अंत नेमका कधी होणार? आज देशातील सामान्य नागरिक अनेक संकटांशी झुंज देत आहे. महागाई सातत्याने वाढत आहे. पेट्रोल, डिझेल, गॅस, वीज, शिक्षण आणि आरोग्यसेवा यांच्या किंमती सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर जात आहेत. दुसरीकडे बेरोजगारीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. उच्चशिक्षित युवक रोजगारासाठी वणवण भटकताना दिसतात. शेतकरी कर्जबाजारीपणामुळे हवालदिल झाला आहे. कामगार असुरक्षिततेत जगत आहेत. मात्र या समस्यांवर ठोस उपाययोजना करण्याऐवजी राजकीय पक्ष परस्परांवर आरोप-प्रत्यारोप करण्यात अधिक व्यस्त दिसतात. भारतीय जनता अनेकदा आश्वासनांवर विश्वास ठेवते. निवडणुकांच्या वेळी मोठमोठी स्वप्ने दाखविली जातात. रोजगार, विकास, शिक्षण, आरोग्य, शेतकरी कल्याण अशा विषयांवर आश्वासनांचा पाऊस पडतो. मात्र निवडणूक संपल्यानंतर त्यातील बहुतांश आश्वासने विस्मृतीत जातात. तरीही जनता पुन्हा त्याच आश्वासनांवर विश्वास ठेवते. ही सहनशीलता की निरुपायता, हा चिंतनाचा विषय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाहीबाबत अत्यंत महत्त्वाचा इशारा दिला होता. ते म्हणाले होते की, ‘राजकीय लोकशाही टिकवायची असेल तर तिचा पाया सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीवर उभा राहिला पाहिजे.’ आजही हा विचार तितकाच महत्त्वाचा आहे. संविधानाने सर्वांना समान अधिकार दिले, पण प्रत्यक्षात समाजातील अनेक घटक अजूनही मूलभूत अधिकारांसाठी संघर्ष करीत आहेत. दलितांवरील अत्याचार, आदिवासींचे विस्थापन, महिलांवरील हिंसा आणि आर्थिक विषमता यामुळे सामाजिक न्यायाचे स्वप्न अद्यापि पूर्ण झालेले नाही. इतिहासात पाहिले तर जनतेच्या सहनशीलतेचा अंत झाला तेव्हा मोठे परिवर्तन घडले आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात ब्रिटिश सत्तेच्या अन्यायाविरुद्ध जनता उभी राहिली. महाड सत्याग्रहात डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाला अन्याय सहन न करता हक्कांसाठी संघर्ष करण्याची प्रेरणा दिली. नाशिकचा काळाराम मंदिर प्रवेश आंदोलन, चवदार तळे सत्याग्रह आणि मनुस्मृती दहन ही केवळ आंदोलने नव्हती, तर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची जनजागृती होती. डॉ. बाबासाहेबांनी कधीही आंधळ्या सहनशीलतेचा पुरस्कार केला नाही. त्यांनी ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ हा मंत्र दिला. हा मंत्र सहनशीलतेच्या मर्यादेची जाणीव करून देणारा आहे. अन्याय सहन करत राहणे हे सद्गुण नसून, अन्यायाविरुद्ध संघटित आणि संविधानिक मार्गाने संघर्ष करणे हे लोकशाहीचे लक्षण आहे. आज अनेक ठिकाणी नागरिकांना साध्या शासकीय सेवांसाठी त्रास सहन करावा लागतो. भ्रष्टाचार, दिरंगाई आणि प्रशासनातील असंवेदनशीलता यामुळे सामान्य माणूस त्रस्त आहे. शेतकरी आत्महत्या करतो, बेरोजगार युवक नैराश्यात जातो, गरीब रुग्ण उपचाराअभावी मृत्यूमुखी पडतो, पण या घटनांबाबत समाजाची संवेदनशीलता कमी होत चालल्याचे दिसते. ही स्थिती लोकशाहीसाठी धोकादायक आहे. मात्र जनतेच्या सहनशीलतेचा अंत म्हणजे हिंसा किंवा अराजकता नव्हे. डॉ. आंबेडकरांनी संविधानिक मार्गाचा आग्रह धरला होता. त्यांनी सांगितले होते की, समाजपरिवर्तनासाठी घटनात्मक साधने वापरणे आवश्यक आहे. त्यामुळे जनतेचा रोष मतदानातून, लोकशाही आंदोलनातून, जनजागृतीतून आणि संघटित कृतीतून व्यक्त झाला पाहिजे. आज गरज आहे ती जनतेने स्वतःच्या शक्तीची जाणीव करून घेण्याची. लोकशाहीत अंतिम सत्ता जनतेची असते. सरकारे येतात आणि जातात, पण जनता कायम असते. नागरिकांनी प्रश्न विचारणे, उत्तरदायित्वाची मागणी करणे आणि आपल्या अधिकारांसाठी जागरूक राहणे आवश्यक आहे. जनतेच्या सहनशीलतेचा अंत कधी होणार, याचे उत्तर एका तारखेत किंवा घटनेत मिळणार नाही. परंतु जेव्हा जनता भीती, उदासीनता आणि निराशा झुगारून देईल, जेव्हा ती संविधानिक मूल्यांच्या आधारावर अन्यायाविरुद्ध उभी राहील, तेव्हा खऱ्या अर्थाने सहनशीलतेच्या मर्यादेचा अंत होईल आणि परिवर्तनाची नवी पहाट उगवेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला संदेश आजही मार्गदर्शक आहे. त्यांनी जनतेला गुलामी स्वीकारण्याऐवजी स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा दिली. त्यामुळे प्रश्न केवळ ‘जनतेच्या सहनशीलतेचा अंत कधी होणार?’ हा नाही; तर ‘जनता संविधानाच्या शक्तीने परिवर्तनासाठी कधी उभी राहणार?’ हा आहे. या प्रश्नाचे उत्तरच भारताच्या लोकशाहीचे भविष्य ठरवणार आहे.●●

सरन्यायाधीशांचे आभार जागवला तरुणांमध्ये एल्गार... !



सर्वोच्च न्यायालयात एका वकिलाने आपल्याला वरिष्ठ वकिलाचा दर्जा मिळावा यासाठी याचिका दाखल केली होती. न्यायायाचिकेवर दि. १५ मे रोजी सुनावणी सुरू असतांना सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी याचिका दाखल करणाऱ्या वकिलाला फटकारले आणि न्यायव्यवस्थेवर टिका करणाऱ्या काही घटकांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच त्यांनी तोंडी टिप्पणी करतांना बेरोजगार युवक, सोशल मीडिया युजर्स आणि माहिती अधिकार कार्यकर्त्यांची तुलना थेट 'झुरळे' आणि 'परजीवी' यांच्याशी केली. त्यामुळे बरेच वादविवाद सुरू झाले आहेत. सरन्यायाधीशांच्या या टिप्पणीमुळे निर्माण झालेल्या वादानंतर, १६ मे रोजी अभिजीत दिपके यांनी ‘कॉकरोच जनता पार्टी’ नावाचा एक व्यंगात्मक डिजिटल गट सुरू केला. या माध्यमातून बेरोजगार तरुणांमध्ये भ्रष्ट व हुकूमशाही व्यवस्था आणि सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे वाढत्या बेरोजगारीविरुद्ध एल्गार उभा झाला, त्याबद्दल खरेतर सरन्यायाधीशांचे आभार मानले पाहिजेत.

“कॉकरोच जनता पार्टी” व तरुण : सरन्यायाधीशांच्या वाक्यावरून अभिजित दिपके या तरुणाने डिजिटल माध्यमातून सुरू केलेल्या या पक्षाने काही तासांतच, इंटरनेटवर धुमाकूळ घातला आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लाखो फॉलोअर्स मिळवले. आज, त्याचे इंस्टाग्रामवर १९ दशलक्षाहून अधिक फॉलोअर्स आहेत, जे भारतातील इतर कोणत्याही राजकीय पक्षापेक्षा जास्त आहेत. तरुणांचा या ग्रुपला मिळालेला प्रचंड प्रतिसाद आणि त्यांच्यात होत असलेली जागरूकता लक्षात घेऊन या ग्रुपच्या एक्सवर, गुरुवारी भारतातील एका कायदेशीर मागणीमुळे अनुपलब्ध होण्यापूर्वी, त्याचे २००,००० हून अधिक फॉलोअर्स होते. अभिजित दिपके यांच्या पक्षाला विविध राजकारणी, कार्यकर्ते, कलाकार आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील लाखो वापरकर्त्यांचा पाठिंबा मिळाला आहे.

अभिजित दिपके लोकशाहीचा सजग प्रहरी : प्राप्त माहितीनुसार अभिजित दिपके हा ३० वर्षीय तरुण आहे. त्याने पुण्यातून पत्रकारितेची पदवी घेतली असून सध्या तो बॉस्टन विद्यापीठात जनसंपर्क विषयात पदव्युत्तर शिक्षण घेत आहे. २०२० ते २०२३ या काळात तो आम आदमी पार्टीशी संबंधित होता आणि त्याने पक्षाच्या सोशल मीडिया टीममध्ये स्वयंसेवक म्हणून काम केले होते. अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने जिंकलेल्या २०२० च्या दिल्ली विधानसभा निवडणुकी दरम्यान अभिजीतने मीम-आधारित डिजिटल प्रचारावर काम केले होते. देशातील व्यवस्थेत वाढलेला भ्रष्टाचार, सरकारचे कायदबाह्य निर्णय, आर्थिक विषमता व बेकारी वाढविणारी आणि मूठभर भांडवलदारांचे हित साधणारी आर्थिक धोरणे याबद्दल तो सतर्क असून युवकांमध्ये जागृती निर्माण व्हावी यासाठी तो सजग आहे, म्हणजे खऱ्या अर्थाने तो लोकशाहीचा प्रहरी आहे.

सिजेपी, तरुणाईचा एल्गार आणि व्यवस्था : झुरळ जनता पार्टी अर्थात सिजेपी म्हणजे, ‘ज्या लोकांना मोजायला व्यवस्था विसरली, त्यांच्यासाठीचा राजकीय पक्ष होय’ हा पक्ष स्वतःला ‘आळशी आणि बेरोजगारांचा आवाज’ म्हणवतो. या पक्षाच्या वेबसाइटवरील ‘पात्रता निकषांनुसार’, पक्षात सामील होण्यासाठी व्यक्ती ‘बेरोजगार, आळशी आणि सतत ऑनलाइन’ असणे आवश्यक आहे आणि तिच्यामध्ये ‘व्यावसायिकपणे संताप व्यक्त करण्याची क्षमता’ असली पाहिजे. या पक्षाने मीम्सचा वापर करून केलेल्या धारदार राजकीय व्यंग आणि भाष्याद्वारे ऑनलाइन प्रसिद्धी मिळवली. त्यांची बहुतेक सामग्री बेरोजगारी, परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटणे आणि शिक्षण यांसारख्या तरुणांच्या समस्यांवर केंद्रित असते, जी ग्राफिक्स, ॲनिमेशन, जाहीरनामे आणि सनदेच्या स्वरूपातील मागण्यांच्या माध्यमातून सादर केली जाते. ‘सिजेपी’ या ग्रुपच्या माध्यमातून तरुणांमध्ये भ्रष्ट व्यवस्थेविरुद्ध धुमसत असलेल्या उद्रेकाचा विस्फोट झाला. तरुण उघडपणे आपल्या भावना व्यक्त करू लागले. त्यांच्यात व्यवस्थेविरुद्ध डिजिटल का होईना पण एल्गार करण्याची भावना जागृत झाली. सिजेपीमुळे व्यवस्थेतील मनमानी आणि भ्रष्टाचार उखडून फेकण्यासाठी शांततेच्या मार्गाने उभी होत असलेली क्रांती फार आवश्यक आहे. कारण तरुणच परिवर्तन घडवू शकतात. सिजेपी ग्रुपने अवघ्या काही दिवसात मिळविलेली लोकप्रियता आणि त्यातून तरुणांमध्ये व्यवस्थेविरुद्ध व्यक्त होत असलेल्या संतापाच्या उद्रेकामुळे कदाचित सरकार विरुद्ध जेन झी आंदोलन उभे होईल याचा सरकारने धसका घेतला आहे. त्यामुळे या पक्षाचे एक्स अकाउंट भारत सरकारने कायदेशीर मागणीनंतर ब्लॉक केले. त्यासाठी सरकारने आयटी ॲक्टच्या कलम ६९ ए अंतर्गत गुप्तचर विभागाच्या अहवालाचा हवाला देत राष्ट्रीय सुरक्षा आणि सुव्यवस्था धोक्यात येत असल्याचे कारण दिले. पण कोणत्याही डिजिटल किंवा सोशल ग्रुपमुळे अवघ्या काही दिवसात राष्ट्रीय सुरक्षा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे असा दावा करणे हायस्पद वाटते. खरे म्हणजे सिजेपीने अवघ्या काही दिवसांत सोशल मीडियावर इतकी प्रचंड लोकप्रियता मिळवली की, इन्स्टाग्राम हँडलने थेट सत्ताधारी भाजपच्या फॉलोअर्सचा आकडाही ओलांडला. सिजेपीचा वाढता प्रभाव पाहून सरकारने त्याचे एक्स अकाउंट भारतात ब्लॉक करण्याचे निर्देश दिले, याचा अर्थ सरकारला तरुणांमध्ये सजगता, जागरूकता व वैचारिकता निर्माण होऊ नये असेच वाटते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.



प्रा. डॉ.एम.आर.इंगळे
मो. 9423429060

तरुणांचा उद्रेक विधायक क्रांतीच्या दिशेने उभा व्हावा : सध्या भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था झाल्याचे सांगण्यात येत असून देशाचा आर्थिक विकासदर मजबूत असल्याचे बोलले जाते. मात्र, या आर्थिक वाढीसोबतच बेरोजगारी आणि दर्जेदार रोजगारांच्या निर्मितीतील आव्हाने कायम आहेत. त्यातच आता महागाईने उच्चांक गाठला असून यावर उपाययोजना शोधण्यापेक्षा सरकार लोकांनाच वेठीस धरत आहे. एका आर्थिक सर्वेक्षणानुसार, देशाचा बेरोजगारी दर ३.२% च्या आसपास नोंदवला गेला आहे. औपचारिक नोकऱ्यांच्या तुलनेत असंघटित क्षेत्र आणि कंत्राटी व अल्पकालीन रोजगारांवर अवलंबून राहण्याचे प्रमाण वाढले आहे. आर्थिक वृद्धी होत असली तरी, शिक्षित युवकांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण अजूनही जास्त आहे आणि वेतनवाढ समाधानकारक नाही. गेल्या काही वर्षांपासून देशात खाजगीकरणाच्या नावाखाली देशाची अर्थव्यवस्था मूठभर भांडवलदारांच्या दावणीला बांधली गेली आहे. त्यामुळे महागाई व बेरोजगारी प्रचंड प्रमाणात वाढत आहे. दुसरीकडे शिक्षित तरुण मेहनतीने विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत. मात्र शिक्षण क्षेत्रात भ्रष्टाचाराने थैमान घातले असून स्पर्धा परीक्षांमध्ये गैरप्रकार व पेपरफुटीची प्रकरणे वाढली आहेत. रोजगार मागण्यासाठी मोर्चा काढणाऱ्या तरुणांवर पोलिसांकडून ते देशद्रोही असल्यासारखा लाठीमार करून व पाण्याचे फवारे सोडून त्यांचा आवाज दाबून टाकला जात आहे. परिणामी देशातला तरुण अस्वस्थ आहे. या अस्वस्थतेतून सिजेपीला मिळालेला प्रतिसाद ही सरकारसाठी धोक्याची घंटा असल्याची नांदी ठरू नये म्हणून अभिजित दिपके यांच्या एक्स अकाउंटवर बंदी घातली आणि त्याला जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. ही बाब व्यवस्थेचे अपयश दर्शविणारी आहे. एकीकडे सरकारी नोकऱ्या उपलब्ध नाहीत, हाताला काम नाही, उद्योगासाठी पैसा नाही. त्यातच कंत्राटी पद्धतीने नोकर भरती करून सरकार शिक्षित तरुणांची टिंगल करत आहे आणि आता सरन्यायाधीशांनी देखील तरुणांना झुरळ व परजीवीची उपमा देऊन अपमानित केले आहे. त्यामुळे तरुणाईत उद्रेक निर्माण होणे साहजिक आहे. या उद्रेकातून विधायक संघर्ष उभा व्हावा आणि सामाजिक, आर्थिक व राजकीय लोकशाही बळकट करण्यासाठी तरुणाईने पुढे यावे हीच सदिच्छा.●●

‘देशाच्या प्रगतीची धुरा, तरुणांच्या हाती;
नव्या विचारांनी करूया, भारताची प्रगती!’

आभासी विकासाला ‘आभासीश’ विरोधकांची धास्ती कां?

कॉक्रोच नावाचा एक साधारण कीटक हल्ली अक्षरशः सेलिब्रिटी झालेला आहे. सर्वोच्च न्यायालयात त्याचा उल्लेख काय झाला आणि तो अचानक इन्स्टाग्रामवर दोन कोटी लोकांना आपलासा वाटायला लागला. सध्या त्यांनी ‘कॉक्रोच जनता पार्टी’ (CJP) या एका आभासी राजकीय पक्षाला डोक्यावर घेतले आहे.

तसा न्यायालयांना ‘कॉक्रोच’ हा नवीन नाही. एकदा जून 2022 मध्ये अमेरिकेत न्यूयॉर्क शहरात एका कोर्टात त्याचा असाच धुमाकूळी प्रवेश झाला होता. काही लोकांनी प्लास्टिकच्या डब्यात लपवून जिवंत कॉक्रोच कोर्टात आणले. त्यांना सुनवाई होत असलेल्या केसचे शूटिंग करायचे होते. कोर्ट त्याची परवानगी देत नव्हते म्हणून त्यांनी आणलेले जिवंत कॉक्रोच कोर्टात सोडून दिले आणि पाहता-पाहता ते सर्व दूर पसरले आणि सगळेच हादरले!

सर न्यायाधीश श्री. सूर्यकांत यांना हा किस्सा माहीत असावा कदाचित. त्यांनी त्यांच्या एका विधानातून देशातील बेरोजगार आणि त्रस्त तरुणांची तुलना ‘कॉक्रोच’शी करून ते असेच ‘सिस्टम’मध्ये सगळीकडे पसरतात असे म्हटले होते, असा लोकांचा आरोप आहे. त्यांनी 15 मे 2026 ला ते वादग्रस्त वक्तव्य केले आणि दुसऱ्याच दिवशी, 16 मे ला एका उच्च-शिक्षित अभिजित दिपके नावाच्या भारतीय तरुणाने अमेरिकेत बसून कॉक्रोच नावावर एक आभासी पक्ष तयार केला. तो पक्ष म्हणजे ‘कॉक्रोच जनता पार्टी’ (सीजेपी). “इंस्टाग्राम” या सोशल मिडिया पोर्टलवर पुढे दोन - तीन दिवसात त्याने जेमतेम साठ-पासष्ट मजकुर आणि कार्टून पोस्ट केले आणि, काय नवल? “इंस्टाग्राम” वर त्याचे चक्क दोन कोटीहून अधिक फॉलोअर्स झालेत. महत्वाचे म्हणजे भारतात सर्वदूर सत्तेत असलेला ‘बीजेपी’ आणि सर्वात जुना पक्ष ‘कांग्रेस’ यांचे दोघांचे मिळून इतके फॉलोअर्स नाहीत. हा चमत्कार कसा झाला? एकीकडे प्रचंड सत्ता, पैसा आणि कायदेशीर यंत्रणांनी सज्ज असलेले सरकार व न्यायपालिका आणि दुसऱ्या बाजूला केवळ एका रात्रीत सोशल मीडियाच्या अल्गोरिदममधून जन्माला आलेली केवळ आभासी कॉक्रोच जनता पार्टी. सत्तेच्या सर्वोच्च शिखरावर बसलेल्या यंत्रणेला एका ‘आभासी’ नावाच्या पक्षाची भीती का वाटावी? इथपासून ते लोकशाहीचे स्तंभ एकत्र येण्याच्या परिणामांपर्यंतचा वेध घेणारा हा विश्लेषणात्मक लेख लिहिण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

१. **‘तोफेपेक्षा टोमणा प्रभावी’ :** व्यंग आणि व्यंगचित्र याची ताकद कमालीची असते. विरोधकांना किंवा रस्त्यावरील आंदोलकांना सत्तेच्या बळावर नमवणे सोपे असते. त्यांना परजीवी, परदेशी दलाल म्हणून बदनाम करता येते, गुन्हे दाखल करता येतात, तुरुंगात टाकता येते किंवा त्यांच्या मागे तपास यंत्रणांचा ससेमिरा लावून त्यांचा आवाज बंद करता येतो. परंतु, व्यंग, विनोद आणि उपहास याचा मुकाबला करणे सरकारसाठी सगळ्यात कठीण काम असते. ‘कॉक्रोच जनता पार्टी’ (सीजेपी) ने नेमके हेच केले. त्यांनी ‘जेन झी’ च्या भाषेत म्हणजे मिम्सच्या माध्यमातून संवाद साधला. एआय (AI) चा वापर करून सूट-बूट घातलेले कॉक्रोच, धारदार उपरोधाने भरलेले रील आणि व्यवस्थेच्या ढोंगीपणावर मारलेले चाबूक यामुळे ही चळवळ तरुणांच्या गळ्यातील ताईत बनली. जेव्हा एखाद्या बलाढ्य क्रूर विलनवर नायक हसतो, तेव्हा त्याचा दरारा संपतो. सीजेपीने अत्यंत क्रूर वास्तवाला विनोदाची अशी फोडणी दिली की, सरकारला या ‘हास्यास्पद वाटणाऱ्या’ चळवळीची अधिकृतपणे धास्ती घ्यावी लागली. त्यांच्या सोशल मिडिया आणि इंटरनेट वरील खात्यांवर बंदी आणावी लागली.



२. **अपमानाचे शस्त्रात रूपांतर :** शत्रूने केलेल्या अपमानालाच स्वतःचे सर्वात मोठे हत्यार बनवणे, ही एक अत्यंत प्रभावी राजकीय खेळी आहे. भारतीय राजकारणात या कलेचे सर्वात मोठे कलाकार स्वतः प्रधानमंत्री नरेंद्र मोदी राहिले आहेत.



ॲड. हरिश्चंद्र सुखदेवे
मो. 9422811511

२०१४ च्या निवडणुकीपूर्वी मोदींना ‘चहा विकणारा’ म्हणून हिणवले होते. मोदींनी तो अपमान शांतपणे पचवला आणि त्याचे ‘चाय पे चर्चा’ या महामोहिमेत रूपांतर केले. मोदींनी स्वतःला प्रस्थापित लोकांच्या विरोधात लढणारा गरीब, ‘ओबीसी’ माणूस म्हणून सादर केले. तसेच २०१९ मध्ये जेव्हा ‘चौकीदार चोर है’ अशी त्यांच्यावर टीका झाली, तेव्हाही त्यांनी “मैं भी चौकीदार” अशी मोहीम चालवून संपूर्ण देशाला ‘चौकीदार’ बनवून टाकले.

२०२६ मध्ये मोदींचा पैटर्न उलटा फिरला. न्यायव्यवस्थेने जेव्हा सुशिक्षित, बेरोजगार तरुणांना ‘कॉक्रोच’ म्हटले, तेव्हा त्या अपमानाला “होय, आम्ही कॉक्रोच आहोत” अशी मोहीम त्यांनी सुरू केली. सोशल मीडिया प्रोफाइलवर कॉक्रोचचे सिम्बॉल्स अभिमानाचे प्रतिक म्हणून तरुणांनी वापरले.

३. **जाहिरातबाजीतून उभा केलेला आभासी विकास :** कॉक्रोच जनता पार्टी एवढ्या मोठ्या प्रमाणावर वायरल होण्याचे मुख्य कारण म्हणजे देशातील जनतेला, विशेषतः युवकांना, सरकारच्या अनेक विकास योजना प्रत्यक्ष जमिनीवर ‘आभासी’ वाटू लागल्या आहेत. ‘अच्छे दिन’चे आश्वासन आणि बेरोजगारीचे वास्तव, दरवर्षी २ कोटी रोजगार देण्याचे आश्वासन आणि महागाई कमी करण्याचा दावा आजच्या तरुणांसाठी केवळ निवडणूक भाषणांमधील जुमले ठरले आहेत. नीट (NEET) सारख्या राष्ट्रीय पातळीवरील परीक्षांमधील पेपर लीकचे घोटाळे, सीबीएसई (CBSE) चा मूल्यांकन बाबतचा वेंधळेपणा, अनेक रोजगार परीक्षा रद्द होणे किंवा अनेक वर्ष त्यांचा निकाल जाहीर न होणे यामुळे तरुणांचे भविष्य अंधारात आले आहे. ‘जीडीपी’ आकडे म्हणतात देशाची प्रचंड प्रगती झाली, तरीही साठ-सत्तर टक्के जनता फुकटच्या राशनवर जगते. देशाचा जो विकास झाला तो सरकारी प्रचारात झाला आणि काही ठराविक उद्योगपतींच्या संपत्तीत झाला. जीएसटी आणि नोटाबंदीच्या धक्क्यातून स्थानिक लहान उद्योग (MSMEs) आणि सामान्य माणूस अजूनही पूर्णपणे सावरलेले नाहीत. आभासी विकासाचे सर्वात मोठे आणि जिवंत उदाहरण म्हणजे ‘स्मार्ट सिटी मिशन’! २०१५ मध्ये या योजनेचे उद्घाटन करताना प्रधानमंत्री मोदी म्हणाले होते की, ‘शहरीकरण हे संकट नाही तर संधी आहे आणि स्मार्ट सिटी म्हणजे तंत्रज्ञानाच्या आधारे नागरिकांचे जगणे सुसह्य (Ease of Living) करणे.’ अनेक वर्ष या योजनेचा मुख्य चेहरा ठरला इंदोर शहर. या ‘स्मार्ट’ शहरातील नागरिकांना सांडपाणी मिश्रीत पाणी प्यायची पाळी यावी! हीच परिस्थिती अनेक शहरांची आहे. नागपूरच्या पूर्व आणि उत्तर भागात ‘स्मार्ट सिटी’च्या नावाने चाललेल्या विकासाने लोकांचे जगणे मुश्किल करून टाकले आहे. वरवरची चकाकी आणि जमिनीवरचे वास्तव यात फार मोठी तफावत या आभासी विकासाने करून ठेवली आहे. मग ‘कॉक्रोच’ तर पसरणारच!●●

विज्ञानवादी पं. जवाहरलाल नेहरू व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना संत म्हणावे की राष्ट्रपुरुष? तत्त्ववेत्ता, स्वातंत्र्याच्या धगधगत्या यज्ञकुंडात सर्वसामान्य खेडूत माणसाला राष्ट्रभक्तीने प्रेरित करणारा, अशिक्षित लोकसमूह विदर्भात ज्यांच्या शब्दावर राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हायचा. महात्मा गांधींनी १९३६ मध्ये तुकडोजी महाराजांना एका व्यक्तीच्या बुवाबाजीच्या तक्रारीवरून भेटीला बोलावले. तुकडोजी महाराजांच्या राष्ट्रभक्ती विचाराने गांधीजींना मित्र बनवले. सेवाग्राम आश्रमात काही दिवसांच्या मुक्कामासाठी तुकडोजींना आमंत्रित केले. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अनेक राष्ट्रभक्तांशी भेटी सेवाग्रामात झाल्या. अनेकांशी तुकडोजींची मैत्री झाली.

पण पं. जवाहरलाल नेहरू यांची भेट व्हायला वेगळेच कारण घडले. भारताचे प्रथम राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी ३० जानेवारी १९५४ रोजी गांधी स्मृति दिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रपती भवनात करून तुकडोजी महाराजांच्या भजनाचे आयोजन केले. या दोन्ही व्यक्तींच्या अनेक भेटी झाल्या होत्या. तुकडोजींचा भजन-प्रभाव डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्यावर होता.

राष्ट्रपती भवनात तत्कालीन भारताचे सर्व केंद्रीय मंत्री, महत्त्वाचे राजकीय पुढारी, अभ्यासक यांच्या उपस्थितीत भजन कार्यक्रम संपन्न झाला. या भजन कार्यक्रमाचे निमंत्रण प्रधानमंत्री पं. जवाहरलाल नेहरू यांना राष्ट्रपती महोदयांनी दिले. कामाच्या व्यस्ततेमुळे येऊ शकत नाही असे सांगत हा प्रसंग विज्ञानवादी नेहरूंनी टाळायचा प्रयत्न केला. भजन-पूजन सोंगढोंग असते, हा त्यांचा अनुभवी समज असावा. राष्ट्रपतींच्या ते लक्षात आले असावे. राष्ट्रपती राजेंद्रबाबूंनी नेहरूंना समजावले, ‘तुकडोजींचे भजन राष्ट्रीय असतात, आपण रेडिओवर लाईव्ह कार्यक्रम ऐकावा, पटल्यास भजन कार्यक्रमात यावे.’


पं. जवाहरलाल नेहरूंनी कारच्या रेडिओवर तुकडोजी महाराजांच्या भजनाचे शब्द ऐकले, खंजेरीची थाप ऐकली. विमानतळावर विदेशी पाहुण्यांच्या स्वागतासाठी जाणाऱ्या नेहरूजींनी परदेशी राज्यमंत्र्यांना विमानतळावरून पाहुण्यांना घेऊन राष्ट्रपती भवनात पोहोचा, असा आदेश देत नेहरूजी भजनाच्या कार्यक्रमात सहभागी झाले. भजनाचे बोल, खंजेरीची थाप यातून सर्व उपस्थितांना तुकडोजी महाराज राष्ट्रभक्ती, राष्ट्रधर्मासोबतच प्रत्येकाला कर्तव्याची जाणीव करून देत होते :-

‘बिगड़ गयी शासन की रीति। साम-दाम-दंडन की नीति॥
अपना-पराया देख-देखकर, झुके न्याय का तोल॥
अब तो आँखे खोल! बंदे! अब तो आँखे खोल॥’

भारावलेले शब्द राजकीय पुढाऱ्यांना चिंतन करायला लावत होते. भजन संपले. खंजेरीची थाप थांबली. राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी तुकडोजी महाराजांचे आभार मानताना सहज बोलले, ‘ईश्वरभक्ती तो अनेक संतों ने सिखाई, मगर आप तो राष्ट्रभक्ती में ईश्वरभक्ती को देखते हो. राष्ट्रधर्म का नया अलख आपने जगाया. आप संत ही नहीं 'राष्ट्रसंत' हो.’ राष्ट्रभक्ती जागवणारा संत म्हणून 'राष्ट्रसंत' - प्रसिद्धी माध्यमांनी या सन्मानाला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी दिली. हा कागदाच्या डिग्रीचा सन्मान नव्हता. तुकडोजींना सहज शब्दांतून मिळालेला राष्ट्रसंत हा सन्मान लोकमनात रुजला. १९५५ मध्ये जपान येथे घडलेल्या ऐतिहासिक ‘विश्वधर्म-विश्वशांती परिषदेचे’ निमंत्रण भारताचे प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरूंना प्राप्त झाले. त्यांनी भारतातून एक प्रतिनिधी मंडळ या अधिवेशनाला पाठवले. त्या मंडळाचे नेतृत्व नेहरूंनी अल्पशिक्षित, मराठी चौथी वर्गही शिक्षण नसलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांकडे दिले. राष्ट्रसंतांच्या वैचारिकतेची खोली विज्ञानवादी नेहरूंनी तपासली होती. खरे अध्यात्म त्यांना कळले होते. जपान अधिवेशनात भारताकडून प्रधानमंत्री पं. जवाहरलाल नेहरूंनी पाठवलेल्या विश्वशांती ठरावाची चर्चा रंगली, काही विद्वान याला विरोध करीत होते. जपान येथील टोकियो शहरातला तो दिवस होता. ४ ऑगस्ट १९५५. राष्ट्रसंतांच्या शब्दांतच हा प्रसंग ऐका -



जनक्रांतीच्या पाऊलवाटा



ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक
मो. 9823966282

‘खुला अधिवेशन था. काफी प्रस्तावों के बाद, आचार्य नामक कार्यकर्ताने पंडित जवाहरलालजी का भगवान बुद्ध के पंचशील तत्व को विचार प्रस्तावस्वरूप विश्वशांती के लिए रखा. उसके विरोध में दो-चार ही व्यक्ति थे; मगर बड़ा सताया उन्होंने! प्रस्ताव पास नहीं होने देते थे. तब मैंने आचार्य से कहा, 'एक तो प्रस्ताव रखना नहीं था और रखा तो अब वापस लेना ही नहीं, हमारे देश की बात रहेगी!'

इस विषय पर एक घंटा खलबली मची. तब हमने सभापती को समझाया. राजनीति की दृष्टी छोडकर पंचशील तत्वों को मान्यता देने में हमारी सभा धार्मिकता का ही रक्षण करती है, इस बात पर मैंने जोर दिया. पंचशील सिद्धान्त में बताई हुई हर बात में विश्वशान्ति की दृष्टि है और हमारी सभा भी यही चाहती है. पंचशील पंडितजी का नहीं, विश्व का है! अतः वह इस सभा का भी विषय हो सकता है...

मेरे इन विचारों से सभा सहमत हुई. प्रस्ताव स्वीकृत हुआ. अगर प्रस्ताव अस्वीकृत होने का मौका आता, तो मैं वहाँ से उठ जाता और कहता कि, 'तुम लोग पक्षपाती हो.'...!’ ही ताकत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या शब्दाची पं. जवाहरलाल नेहरू यांनी पारखली होती. दिल्लीला नेहरूजींनी राष्ट्रसंतांना आपल्या निवासस्थानी नेऊन त्यांचा सन्मान केला. राष्ट्रसंतांचा भजन कार्यक्रम प्रधानमंत्री निवासस्थानाच्या हिरवळीवर घडवून आणला. याच स्नेहाचा वारसा नेहरूंची मुलगी म्हणून इंदिरा गांधी यांनी सांभाळला. गुरुकुंज आश्रमाला त्यांनी भेट दिली. २७ मे, पंडित जवाहरलाल नेहरू यांचे निर्वाण. माझे (ज्ञानेश्वर रक्षक) बालकमंदिरचे शिक्षण असावे. त्या दिवशी मला आठवते, मी माझ्या घरातील प्रार्थना मंदिरातील नेहरूजींच्या फोटोला न्याहाळत होतो. फोटोतून अश्रू टपकतात का म्हणून? हळव्या बालमनाची ती सोच होती. आज नेहरूजींच्या स्मृती आठवल्या.●●

वाचकांचे विचारपिठ

बहुजन सौरभ

महाराष्ट्राला भोंदूबाबांचे ग्रहण लागले !


संतांच्या आणि थोरांच्या विचाराचा हा महाराष्ट्र आहे. मुख्यतः दैनंदिन जीवनात आपण संताच्या नावाचा नाम जप करतो पण विचार अजिबात अंगीकारत नाही. जीवनभर भजने गातो पण आचरणात नाही, श्रोत्यांना उपदेश करतो पण आचरणात शून्य असतो. धर्मवान बनतो जात-पोटजात सांभाळत बसतो. म्हणून आमच्यावर कोणीही येतो व राज्य करतो. साधू-संताना डोक्यावर घेवून नाचतो, पण त्यांचे विचार डोक्यात घेत नाही. कृतीत वागत नाही म्हणूनच बहुजन समाजाला अध्यात्माच्या नावाखाली कर्मकांडांच्या जाळ्यात अडकवून त्यांच्या विचारांवर नियंत्रण मिळवण्याचा हा एक सुनियोजित कट आहे, जो त्यांना सतत मानसिक गुलामगिरीकडे ढकलत असून अधोगतिला जात आहोत. पुरोगामी विचारांची परंपरा जपणाऱ्या महाराष्ट्राची ओळख विवेक, विज्ञाननिष्ठा आणि सामाजिक जागृती यावर उभी आहे. महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, निष्काम कर्मयोगी संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांसारख्या महापुरुषांनी अंधश्रद्धेविरुद्ध लढा देत समाजाला विचारांचे स्वातंत्र्य दिले. तरीही अलीकडील काही गाजलेल्या प्रकरणांनी एक कटू वास्तव समोर आणले. भोंदूगिरीचे जाळे अजूनही समाजाच्या मनोभूमिकेत खोलवर रुजलेले आहे. भीती, असुरक्षितता आणि 'क्षणात उपाय' मिळवण्याची मानसिकता यामुळे सामान्य माणूसच नव्हे, तर सुशिक्षित, सधन आणि प्रभावशाली लोकही अशा भोंदूंच्या जाळ्यात अडकताना दिसतात. अंधश्रद्धा निर्मूलन कायदा अस्तित्वात असला, तरी केवळ कायदे पुरेसे ठरत नाहीत, हे वारंवार दिसून येते. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर केवळ प्रशासनात नाही, तर समाजाच्या सामूहिक जागृतीत आहे. शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचार आणि प्रश्न विचारण्याची सवय रुजवली पाहिजे. धर्म आणि अध्यात्म यांचा खरा अर्थ समजून घेतला, तर भोंदूगिरीला आळा बसेल. कारण धर्म माणसाला उन्नत करणारा असतो, तर अंधश्रद्धा त्याला अधोगतीकडे नेणारी असते.●●

- देवीदास लाखे
(माजी सैनिक, आर.बी.आय.रिटायर्ड)

“ मोठ्या प्रवासाची सुरुवात, एका छोट्या पावलाने होते... ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA

उपवर्गीकरणातील संघर्ष बिंदू



संविधानिक आरक्षणामुळे संधीची समानता निर्माण होऊन राष्ट्रीय विकासात प्रतिनिधित्व निर्माण होते आणि यामुळे सामाजिक आणि सांस्कृतिक क्रांती घडवून वर्ण व जातीवादी, प्रस्थापित समाज व्यवस्थेला हरविता येते. या एकाच तत्वामुळे संविधानिक आरक्षण हे अनुसूचित जातीकरिता जीवन मरणाचा प्रश्न आहे. अनुसूचित जातीमधील ५९ जातींपैकी केवळ मांग जातीची अनुसूचित जातीच्या संविधानिक आरक्षणात उपवर्गीकरण झाले पाहिजे अशी मागणी आहे. तर महार जातीचा उपवर्गीकरणाला विरोध आहे. यामुळे आरक्षण उपवर्गीकरणात अन्यायकारक बदल केल्यास शासन आणि जाती दरम्यान तसेच जाती-जाती अंतर्गत संघर्ष उभा राहू शकतो. या संघर्ष बिंदूचे सविस्तर विश्लेषण.

सर्व समावेशक विशेष समिती नसल्यास : अनुसूचित जातीच्या संविधानिक आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याकरिता शासनाचे विविध आधिकारी, सत्ताधारी आणि विरोधी पक्षाचे प्रतिनिधी तसेच समस्याग्रस्त समाजाचे सर्व जातीमधील राजकीय पुढारी, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, प्रतिनिधी यांच्यासह विशेष समिती स्थापन करून विशेष समितीद्वारे संबंधित प्रश्नावर शोध व विचार करून सर्व समावेशक पद्धतीने संबंधित प्रश्नाची सोडवणूक केली पाहिजे. असे जनतेचे सर्वसामान्य मत आहे. शासनाने अनुसूचित जातीच्या संविधानिक आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याकरिता माजी न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांची एक सदस्य समिती नियुक्ती केली आहे व त्यांनी उपवर्गीकरणाचा अहवाल शासनाला सादर केलेला आहे. केवळ एक किंवा दोन लोकांची समिती बनवून उपवर्गीकरण केल्यास सर्व जातींना विश्वासात न घेता त्यांच्यावर लादल्या जाईल त्यामुळे शासन व जाती यांच्यात संघर्ष उभा राहील. त्यामुळे शासनाने उपवर्गीकरणाची प्रक्रिया व्यवस्थित, पद्धतशीर व सर्वसमावेशक करण्याकरिता विशेष समितीची स्थापना करावी.

अन्यायकारक उपवर्गीकरण केल्यास : अनेक राज्यांनी अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण करताना लोकसंख्या सामर्थ्य (जिसकी जितनी संख्या भारी, उसकी उतनी भागीदारी) या सूत्राचा वापर करून उपवर्गीकरण केलेले आढळते. त्यामुळे सर्व जातींना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात उपवर्गीकरणात न्याय वाटा मिळतो. याशिवाय कोणत्याही सूत्राचा वापर करून संख्या सामर्थ जास्त असलेल्या जातींच्या न्याय वाट्यामधून कमी करून इतर जातीला दिल्यास अन्यायकारक उपवर्गीकरणामुळे संघर्ष घडून येईल. हा संघर्ष टाळावयाचा असेल तर शासनाने संख्या सामर्थ्य या सूत्रानुसार आरक्षणाचे उपवर्गीकरण केले पाहिजे.

जातींच्या मागणीनुसार जाती गटात सहभाग न दिल्यास : उपवर्गीकरणात जातीनिहाय अ, ब, क, ड असे उपवर्गीकरणाचे गट तयार केले जातात. संख्या सामर्थ्य प्राप्त जातीला उपवर्गीकरणात जास्त वाटा मिळणार आणि कमी सामर्थ्य असणाऱ्या जातीला कमी वाटा मिळणार त्यामुळे, कमी सामर्थ्य असणाऱ्या प्रत्येक जातीला भविष्यातील विकासाच्या दृष्टीने कोणत्याही जाती गटात सहभागी होण्याचा पूर्ण अधिकार आहे. अल्प सामर्थ्य असणाऱ्या कोणत्याही जातीने ज्या जाती गटां सोबत जाण्याची मागणी केली असेल त्या जाती गटात जर त्यांचा सहभाग झाला नाही आणि शासनाने आपल्या मर्जीने त्या जातीचा इतर गटात सहभाग केला तर संघर्ष निर्माण होऊ शकतो.

धर्मांतरीत बौद्धांना उपवर्गीकरणात वाटा न मिळाल्यास : महाराष्ट्र राज्यात धर्मांतरीत बौद्धांना १९६० पासून अनुसूचित जातीच्या १३ टक्के आरक्षणात भागीदार बनविण्यात आले आहे. आज ते अनुसूचित जातीचे आरक्षण बौद्ध म्हणून घेत आहेत. संविधानिक आरक्षणाचे उपवर्गीकरण हे अनुसूचित जाती, जमाती मधील जातींचे होणार असून अनुसूचित जातीला प्राप्त १३ टक्के आरक्षण जातींचे अ, ब, क, ड असे गट ठरवून वाटप केले जाईल. धर्मांतरीत बौद्ध हे अनुसूचित जाती मधील सर्वच जाती जमाती मधून आलेले असल्यामुळे धर्मांतरीत बौद्ध यांना स्वतंत्र गट बनून त्यांच्या संख्या सामर्थ्यानूसार आरक्षण दिले पाहिजे. धर्मांतरीत बौद्धांचे बौद्ध, नव बौद्ध व बुद्धिस्ट म्हणून असलेले स्वतंत्र आरक्षण समाप्त झाल्यास किंवा धर्मांतरीत बौद्ध यांना स्वतंत्र गट बनून आरक्षण न देता त्यांच्यावर जातीचे आरक्षण लादल्यास संघर्ष निर्माण होईल.

मुकेश दुपारे
मो. ९४२३६४९६४६

उपवर्गीकरणात जाती-जातीमधील संघर्ष : संविधानिक आरक्षण उपवर्गीकरणात संघर्ष झालाच तर शासन व ज्या जातीवर अन्याय होईल. त्या जाती यामध्ये संघर्ष घडून येण्याची शक्यता आहे. कारण आरक्षण उपवर्गीकरणाची मागणी ही एक जात दुसऱ्या जातीला करीत नसून सर्व जाती शासनाला मागणी करतात त्यामुळे जाती-जातीत संघर्ष घडून येण्याची शक्यता नाही. परंतु आयु. बी. जी. वाघ, आयु. दिवाकर शेजवळ, ॲड. सुरेश माने आणि आयु. ई. झेड. खोब्रागडे यांनी लिहिलेल्या लेखात किंवा युट्युब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीमध्ये स्पष्ट केले की, उपवर्गीकरणांमध्ये जाती-जातीत भांडणे निर्माण होतील. त्यांचा अनुभव फार मोठा आहे त्यामुळे त्यांच्या विचारांना डावलले जाऊ शकत नाही. जाती-जातीत संघर्ष घडून येईल या संदर्भात संशोधन केल्यास असे आढळते की, एका जातीने दुसऱ्या जातीला अपमानास्पद बोलणे, शिवीगाळ करणे, डिवचने, महापुरुषांच्या संदर्भात चुकीचे लिहिणे किंवा बोलणे, याबाबत सर्व जातींनी सतर्क राहून संविधानिक मार्गाने आपली मागणी शासनाकडे केली पाहिजे. उपवर्गीकरणाची मागणी करणाऱ्या जाती जर फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीला फितूर झाल्यास, त्यांचे आंदोलन प्रस्थापित समाज व्यवस्थेचा मेंदू व यांचे शरीर यांच्या संगनमताने कट कारस्थान करून जर लढण्यात आले. तर आरक्षण उपवर्गीकरणाची मागणी करणाऱ्या जाती व आरक्षण उपवर्गीकरणाला विरोध करणाऱ्या जाती यांच्यामध्ये संघर्ष होण्याची शक्यता आहे. अन्यथा जाती-जातींमध्ये संघर्ष निर्माण होण्याची कोणतीही शक्यता नाही. एकंदरीत अनुसूचित जातीमधील ५९ जातींपैकी केवळ मांग जातीची उपवर्गीकरणाची मागणी आहे. ५८ जातीची उपवर्गिकरणाची मागणी नाही. तरीसुद्धा शासनाने उपवर्गिकरणाची प्रक्रिया राबवलेली आहे. त्यामुळे शासनाने उपवर्गिकरण केल्यास शासन व जाती यांच्या दरम्यान मोठा संघर्ष उभा राहू शकतो, करिता शासनाने उपवर्गिकरणाची प्रक्रिया रद्द केली पाहिजे.●●

अनंतायन

जमाखोरी



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

म्हणतात ना आधीच मर्कट त्यातही मद्य प्याला. त्या नेत्याचीही अवस्था अगदी तशीच झाली होती. मुळात तो लालसी वृत्तीचा त्यातही योग्यता नसूनही राजकारणात त्याला मिळालेल्या मोठ्या पदामुळे तो कमालीचा अहंकारी झालेला होता. त्याच्या भ्रष्ट कारभाराचे कितीतरी कारनामे चर्चेचा विषय ठरले होते. तेव्हा त्याचा मित्र त्याला म्हणाला “ त्या व्यक्तीला कोणत्याही शत्रूची आवश्यकता नसते. त्याचा मोह आणि अहंकार त्याला स्वतःच स्वतःचा शत्रू बनवतो. ह्याऊलट जो ऊत्तम आहे त्याला सर्वोत्तम बनायचे असेल तर स्वतःवर केल्या गेलेली वास्तववादी टिका धैर्यपूर्वक ऐकुन, सहन करून स्वतःत बदल करायची तयारी ठेवावी लागते पण तुझ्यासारख्या अहंकारी व्यक्तीला ते मान्य नसते. ऊलट तुझ्यासारखी मंडळी इतरांकडे अंगुलीनिर्देश करण्यात धन्यता मानते . तुम्हाला आरसा दाखवला तरीही काही फरक पडत नाही. अहंकार मग तो सत्तेचा, संपत्तीचा, प्रतिष्ठेचा कशाचाही असू शकतो. पण ह्या अहंकाराने आंधळे झालेल्यांना हे कळत नाही की, ‘ ना कद बड़ा, ना पद बड़ा, मुसीबत में जो साथ खड़ा, वो सबसे बड़ा ‘असे जुनेजाणते लोक सांगून गेले आहेत. अहंकारी आणि मोहाने पछाडलेल्या मानसिकतेचे लोक साध्यासरळ लोकांचा गैरफायदा घेतात. आता मला वाटते की तुझ्यासोबत वागतांना समुद्रासारखे वागावे. थोडी सावधगिरी बाळगावी आणि कठोर व्हावे अन्यथा नदीसारख्या गोड व्यक्तीला तुम्ही कधीही पिऊन टाकू शकता. मला नेहमी तुझ्या लालसीपणाचा अनुभव येतो तुझी चालाखी लक्षात येऊनही मी काही बोलत नाहीत पण तुला वाटते आपण यशस्वी झालो, ‘ चुप यूँ ही नहीं कि, लब्ज कम है, चुप इसलिए है कि, लिहाज़ बाक़ी है ‘योग्यता जरी कुणाला शिखरावर पोहचवत असेल तरी तेथे टिकून राहण्यासाठी चारित्र्य आवश्यक असते. जे तुम्हाला मिळवायचे ते कमावणे शिकावे. . मोह करायचा तर तो श्रमाच्या आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर करा . लालसी वृत्तीमुळे इतरांपासून अपेक्षा वाढतात, तुझा मित्र म्हणून आज मी कठोर शब्दात बोललो आहे. वेळीच स्वतःला सावर . तु मोठा हो . आम्हाला आनंद वाटेल . अपेक्षा एवढीच आहे की, तुझा अहंकार आणि मोह नियंत्रणात ठेव. हे बघ ! कर्तृत्ववान लोकांची ही भूमिका असते की, फ़क़ीराना तबीयत है , मिले जो बाँट देते है, इनसे किसी चीज़ की जमाख़ोरी नहीं होती, फिर वो दौलत हो , दुआ हो या दवा.●●

बहुजन सौरभ

धेनुगळ



रायगड (कुलाबा) जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी : रायगड जिल्ह्याच्या भुप्रदेशावर मौर्य सातवाहन क्षत्रप, त्रिकुटक, कलचुरी, कोकणचे मौर्य चालुक्य, राष्ट्रकुट, शिलाहार यादव, बहमनी, गुजरातचे सुलतान, अहमदनगरची नीजामशाही, पोर्तुगीज, सिदी, मराठे, मुघल, आंग्रे व ब्रिटीशांनी राज्य केले आठव्या शतकापासून प. भारतावर राष्ट्रकुटांचे मंडलिक असलेल्या तीन शिलाहार राजघराण्याचा अंमल होता. सुमारे इ. स. ७७० ते १०२० पर्यंत द कोकणावर पहिल्या घरण्याने ८०० ते १२५० पर्यंत ऊ. कोकणावर दुसऱ्या घराण्याने आणि आठव्या ते दहाव्या शतकाच्या अखेरपर्यंत सातारा कऱ्हाड व कोल्हापूर बेळगाव परिसरावर तिसऱ्या घराण्याने राज्य केले. शिलाहार घराण्याच्या काळात गधेगळ, सतिगळ, नागगळ, विरगळ, वधेनुगळ, ऐतिहासिक दगडी स्तंभ निर्माण झाले होते.

ऐतिहासिक दृष्ट्या धेनुगळाचे महत्व : धेनुगळ म्हणजे गाय, वासरू, दगड हे एक दानपत्र आहे. दान दिलेल्या गावाची सीमा दाखविण्यासाठी धेनुगळ वापरला जात असे. आयताकृती उभ्या दगडावर गाय आणि वासरू कोरलेले असते. वरच्या बाजुला सुर्य आणि चंद्र कोरलेले असतात. गाय हे राजाचे प्रतिक असुन वासरू हे प्रजेचे प्रतिक आहे. गाय ज्याप्रमाणे वासराचे पालन करते तसेच राजा प्रजेचे पालन करते. या गाय वासरू दगडावर काही ठिकाणी शिलालेख कोरलेले पहावयास मिळतात.

1. सुर्य व चंद्र : निसर्गात सुर्य व चंद्र असेपर्यंत दान केलेली जमीन नष्ट होणार नाही.
2. **मंगळ कळश :** दान केलेल्या जमीनीसोबत नारळ समर्पित केले आहे.
3. **गाय वासरू :** ज्या राज्याने जमीन दान केली आहे ती जमीनीची सीमा ठरवुन प्रजेला विशिष्ट कारणासाठी दान केली आहे.

धेनुगळ बोरघर पोष्ट बापळे ता. अलिबाग : आलिबाग रोहा रोडवरील छोटेसे बोरघर गाव असुन त्याला आठशे वर्षाची ऐतिहासिक पार्श्वभुमी आहे. बोरघर येथे धेनुगळ असुन जवळच प्राचिन शिव मंदीर आहे. धेनुगळवर मंगळ कलश असुन सूर्य व चंद्र तसेच गाय वासरूचे चित्र आहे. या ठिकाणाला गाय कापणी देखील म्हणतात. अति क्रमाणे हाटवुन ऐतिहासिक वारसा जतन करणे गरजेचे आहे. सदरहु धेनुगळ समोर तार - कुंपन करून जमीन खरेदीदाराणे दुर्लक्ष केले आहे. तरी जिल्हा प्रशासन पुरातत्व विभाग यांना निर्देश करावे.●●

संतोष बाबु शिंदे
मो. 9860218733

जनतेच्या प्रश्नांवर नि:शब्द बॉलिवूड स्टार्स, मग तिकीट का घ्यावे?



नुकतेच नागपूर येथील सुरेश भट सभागृहात मुंबईहून प्रसिद्ध कलाकारांची नाटके सादर करण्यात आली. तसेच शहरातील विविध मल्टिप्लेक्स थिएटरमध्ये नवीन हिंदी चित्रपट प्रदर्शित झाले. मात्र, असे दिसून आले की या दोन्ही माध्यमांना प्रेक्षकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. थिएटरमधील रिकाम्या खुर्च्या आणि मर्यादित प्रेक्षक संख्या पाहता एक प्रश्न उपस्थित होतो की, प्रेक्षकांची चित्रपट आणि नाटकांकडे असलेली ओढ कमी होत आहे का? जर आपण याचा सखोल विचार केला, तर काही सामाजिक आणि मानसिक कारणे त्यामागे दिसून येतात.

भारत आज अनेक गंभीर प्रश्नांशी झुंज देत आहे. स्पर्धा परीक्षा, बेरोजगारी, वाढती महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्न, तरुणांचे भविष्य आणि देशाच्या आर्थिक परिस्थितीबद्दल चिंता अशा अनेक विषयांवर सामान्य नागरिक रोज चर्चा करताना दिसतो. अलीकडील NEET परीक्षा पेपर लीक प्रकरणामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य प्रश्नचिन्हात आले आहे. या प्रकरणाने विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता, पालकांमध्ये चिंता आणि समाजात संताप निर्माण केला आहे. अशा पार्श्वभूमीवर एक प्रश्न वारंवार उपस्थित होतो, देशातील मोठे सेलिब्रिटी आणि बॉलिवूड कलाकार समाजातील या प्रश्नांवर तुलनेने शांत का आहेत? जे कलाकार चित्रपटांच्या प्रमोशनसाठी, जाहिरातींसाठी किंवा विविध सामाजिक मोहिमांसाठी पुढे येतात, तेच कलाकार देशातील विद्यार्थ्यांच्या वेदना, बेरोजगारी, आर्थिक संघर्ष किंवा सामान्य नागरिकांच्या समस्यांवर सार्वजनिक भूमिका घेताना फारसे दिसत नाहीत. भारतीय चित्रपट सृष्टीचा इतिहास पाहिला तर असे दिसून येते की पूर्वी अनेक कलाकारांनी देश आणि समाजासाठी पुढाकार घेतला होता. भारत-पाकिस्तान युद्धाच्या काळात त्या वेळचे लोकप्रिय कलाकार राज कपूर, दिलीप कुमार आणि देव आनंद यांनी देशासाठी निधी संकलन, जनजागृती आणि सैनिकांचे मनोबल वाढविण्यासाठी विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतल्याचे अनेकदा सांगितले जाते. त्याच काळात, तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत भारतरत्न लता मंगेशकर यांनी “ऐ मेरे वतन के लोगों, ज़रा आँख में भर लो पानी” हे गीत सादर करून देशवासियांना भावनिकरित्या एकत्र बांधण्याचा आणि सैनिकांच्या बलिदानाची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला होता. त्या काळात कलाकार स्वतःला केवळ पडद्यावरील नायक समजत नव्हते, तर समाजाचाही एक जबाबदार भाग मानत होते.याचप्रमाणे, समाजावर संकट आले की काही कलाकारांनी प्रत्यक्ष मदतीसाठी पुढे येण्याची उदाहरणेही आहेत. १९८५ च्या सुमारास कोपरगाव परिसरात गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती. त्या काळात दूरदर्शनवरील लोकप्रिय रामायण मालिकेत भूमिका साकारणारे अरुण गोविल आणि प्रसिद्ध अभिनेत्री आशा पारेख यांनी कोपरगावला भेट देऊन लोकांशी संवाद साधला व मदतीसाठी पुढाकार घेतल्याच्या आठवणी अनेकांच्या मनात आजही आहेत. या घटनेची माहिती त्या काळातील प्रत्यक्षदर्शी मित्रांकडून ऐकायला मिळते. आज परिस्थिती काहीशी वेगळी दिसते, सोशल मीडियावर सक्रिय असलेले आणि विविध विषयांवर मते मांडणारे कलाकार देशातील तरुणांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांवर, शिक्षणातील अनियमितता, बेरोजगारी किंवा आर्थिक ताण यांसारख्या मुद्द्यांवर तुलनेने कमी बोलताना दिसतात, असे अनेकांना वाटते. NEET पेपर लीक सारख्या घटनांचा परिणाम केवळ परीक्षेपुरता मर्यादित राहत नाही. अनेक विद्यार्थी वर्षानुवर्षे कठोर मेहनत, आर्थिक अडचणी आणि मानसिक तणाव सहन करून या परीक्षेची तयारी करतात. अशा घटनांमुळे त्यांच्या मेहनतीवर पाणी फिरल्याची भावना निर्माण होते. काही राज्यांमध्ये स्पर्धा परीक्षेतील तणाव आणि भविष्याबद्दलच्या चिंतेमुळे विद्यार्थ्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. या घटना समाजासाठी अत्यंत वेदनादायक आणि चिंतेचा विषय आहेत. अर्थात, प्रत्येक कलाकाराने प्रत्येक मुद्द्यावर बोललेच पाहिजे किंवा राजकीय भूमिका घ्यावी, अशी सक्ती असू शकत नाही. प्रत्येकाला वैयक्तिक स्वातंत्र्य आहे. मात्र, जेव्हा कलाकार स्वतःला “जनतेचा स्टार” म्हणून लोकांसमोर मांडतात आणि जनतेच्या प्रेमामुळे लोकप्रियता, प्रसिद्धी व संपत्ती मिळवतात, तेव्हा समाजालाही त्यांच्याकडून किमान सामाजिक संवेदनशीलतेची अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. आज अनेक कुटुंबे मुलांच्या शिक्षणासाठी कर्ज घेत आहेत, भविष्याबद्दल चिंतेत आहेत आणि महागाईशी सामना करत आहेत. अशावेळी समाजातील प्रभावशाली व्यक्तींनी किमान सहानुभूती व्यक्त करावी, लोकांचे मनोबल वाढवावे किंवा योग्य प्रश्नांवर आवाज उठवावा, अशी अपेक्षा चुकीची म्हणता येणार नाही. यामुळे काही लोकांच्या मनात एक प्रश्न निर्माण होतो, जे कलाकार आमच्या प्रश्नांवर बोलत नाहीत, त्यांच्या चित्रपटांवर आम्ही पैसे का खर्च करावे? हा प्रश्न रागातून नव्हे, तर अपेक्षाभंगातून जन्म घेतो. कारण लोक केवळ अभिनयावर प्रेम करत नाहीत, तर त्या व्यक्तिमत्त्वावर विश्वासही ठेवतात. जेव्हा तो विश्वास कमी होतो, तेव्हा प्रेक्षकांचा दृष्टिकोनही बदलू लागतो. मात्र, या चर्चेत एक गोष्ट लक्षात ठेवावी लागेल. चित्रपट उद्योग हा केवळ कलाकारांमुळे चालत नाही. हजारो तंत्रज्ञ, लेखक, संगीतकार, कामगार आणि छोट्या कर्मचाऱ्यांचे जीवन त्या उद्योगावर अवलंबून असते. त्यामुळे संपूर्ण बहिष्कार हा एकमेव मार्ग असू शकत नाही. पण प्रश्न विचारणे, जबाबदारीची अपेक्षा ठेवणे आणि सामाजिक संवेदनशीलतेची मागणी करणे यात काहीच चुकीचे नाही. आजचा प्रश्न फक्त बॉलिवूडचा नाही, तर सार्वजनिक प्रभाव असलेल्या प्रत्येक व्यक्तीचा आहे. समाजाने ज्यांना उंचावर नेले, त्यांनी समाजाच्या वेदना किमान ऐकाव्यात, समजून घ्याव्यात आणि योग्यवेळी आवाज उठवावा, एवढीच अपेक्षा आहे.●●



भगवंतजी भगत
मो. 9423788232

अबकी बार... महंगाई की मार



अर्थनिरक्षर असलेल्या देशातील जनतेला देशाचे अर्थशास्त्र कसे चालते याचा अंदाज कधीच बांधता येत नाही. माध्यमांमधून व्यक्ती पूजेद्वारे प्रतिमा उंचावण्याचा सातत्याने जारी प्रयत्न आणि नेमके सत्य दडवण्याची लागलेली चढाओढ याची भारतीय माध्यम आदर्श उदाहरण आहेत. अलीकडेच नागरिकांना केल्या गेलेल्या काटकसरीच्या आवाहनाचे फायदे माध्यमातील पत्रकार जेंव्हा सांगू लागतात तेंव्हा ते आपल्या मूळ कामाशी प्रतारणा करीत असल्याचेही दिसून येते. देशाची अर्थव्यवस्था जगात चौथ्या क्रमांकावर असल्याच्या बातम्यांचा मारा होतो. पण रँकिंगमध्ये घसरण होऊन ती सहाव्या स्थानावर येते तेंव्हा बातम्या दाबल्या जातात. अर्थव्यवस्थेच्या तोळामासा स्थितीवर कधीकाळी सरकारची पाठराखण करणारे अर्थशास्त्री, उद्योजक सद्यःस्थितीत सरकारची चुकीची धोरणे, कार्यक्रम आणि आकडे फुगवून सांगण्याची प्रवृत्ती यावर भाष्य करतात. त्याची वाच्यता माध्यमे करीत नाहीत. ही स्थिती का ओढवली हा प्रश्न मुख्यधारेतील मोजके पत्रकार आणि यू ट्यूबर पत्रकार उपस्थित करीत आहेत. मुळात पत्रकारांचे काम व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचे आहे. आपल्या देशात स्थिती उलट आहे. म्हणूनच जगातील 180 देशांच्या माध्यम स्वातंत्र्य यादीत आपण 157 व्या क्रमांकावर आहोत. सामान्य माणसांच्या मूलभूत आणि दैनिक समस्यांकडे दुर्लक्ष करून जातीय - धार्मिक द्वेषाच्या चर्चेत रस घेणारे अँकर असल्याने ही घसरण झाली आहे. पारदर्शीपणा नसल्याने सामान्य नागरिक कायम संभ्रमित असतो. धार्मिक द्वेषाच्या गुंगीत देशाच्या आर्थिक स्थितीचा आपल्या वैयक्तिक, कौटुंबिक जीवनावर काय परिणाम होईल याचा विचार करतांना आढळत नाही. अंशी कोटी नागरिक फुकट मिळणाऱ्या पाच किलो अन्नधान्यावर जगत असतांना सोने खरेदीचे आवाहन म्हणजे मोठा विनोद आहे. याचा दुसरा अर्थ असा की निवडक लोक असे व्यवहार करीत आहेत. त्यांचे आर्थिक स्त्रोत तपासण्याची आवश्यकता आहे. अर्थ विषयक बाबी या एक दुसऱ्यावर अवलंबून असतात. मनी कंट्रोलच्या पत्रकार ऐश्वर्या नायर यांनी एक अवलोकन केले असता त्यांना आढळले की, पुरुषांच्या अंडर विअर खरेदीत मागच्या डिसेंबरपासून घट नोंदविली जात आहे. मुद्दा शुल्लक वाटावा असा काहीसा दुर्लक्षित. पण, चिंतन केले तर वास्तव लक्षात येईल. काम करणाऱ्या पुरुषांच्या मिळकतीत महागाईच्या तुलनेत वाढ झाली नाही. इतरही खर्च वाढलेत. त्यामुळे पुरुष आपल्या दैनंदिन महत्वाच्या गरजा पुढे ढकलून असलेली रक्कम एकतर भविष्यात आकस्मिक खर्चासाठी जमा ठेवत असावेत किंवा कुटुंबातील इतरांच्या महत्वपूर्ण गरजांना प्राधान्य देत असावेत. प्रत्यक्ष बाजारात माल उत्पादक कंपन्यांनी आपल्या दरात वाढ केली आहे. (दुधाची विक्री किंमत वाढल्याचे अनुभवत असालच) पॅकबंद साहित्य जसे-बिस्किटे, टोस्ट, चिप्स पॅकेट, साबून, ब्रेड यासारख्या अन्य वस्तू मध्ये भाववाढ केली आहे किंवा त्या वस्तूंचे वजन कमी करून किंमत तीच ठेवली आहे. खाद्य तेलाच्या किंमतीत प्रति पॅकेट तीन रू. भाववाढ झाल्याचे किरकोळ दुकानदार सांगत आहेत. एकूणच भाववाढीने विळखा घालायला सुरवात केली आणि ती किती आवडेल याचा आज कुणालाही अंदाज नाही. पेट्रोल किंवा डिझेल दरात दहा बारा दिवसात (28 मे पर्यंत) तीन चारदा भाववाढ झाली. ही वाढ 7 ते 8 रू. च्या दरम्यान आहे. प्रामुख्याने डिझेल दर सर्वसामान्यांना प्रभावित करतो. त्यामुळे दळणवळण खर्च वाढतो. (डिझेलच्या समस्येमुळे मोठ्या प्रमाणात माल वाहतूक करणारे ट्रक वापरणे थांबविल्याचे ट्रान्सपोर्ट संघटना सांगत आहेत) वस्तू महागतात. प्रवास खर्च वाढतो. होणाऱ्या भाववाढीच्या तुलनेत मिळकतीत वाढ झाल्याचे आकडे नाहीत. उलट, काही कंपन्यांनी कर्मचारी कपात (ॲक्सिस बँक 3000 मेटा 8000 यासह AI च्या वापरामुळे इतरही कंपन्या कर्मचारी कपात करण्याच्या तयारीत असल्याचे विविध बातम्यांमधून लक्षात येते.) करणे सुरू केले आहे. आधीच बेरोजगारीचा चढा दर आणि त्यात कर्मचारी कपातीमुळे अतिरिक्त पडणारा भार स्थिती आणखी गंभीर असल्याचे निदर्शक आहे. गेल्या जानेवारीपासून मे पर्यंत विदेशी गुंतवणूकदारांनी जवळपास दोन ते तीन लाख डॉलर इतकी रक्कम भारतीय उद्योगातून काढली आणि इतरत्र (चीन,क्युबा, द. कोरिया) गुंतवली. त्यामुळे देशांतर्गत डॉलर साठ्यात घट नोंदवली जात आहे. विदेशात फिरायला जाऊ नका, विदेशी नागरिकांना देशात पर्यटनासाठी प्रोत्साहित करा किंवा विदेशातील भारतीयांनी डॉलर पाठवावेत हे आवाहन त्याचे फलित आहे. जेणेकरून डॉलर साठा जमा होऊन कायम राहील. रुपया रोजच डॉलर समोर लोटांगण घालत आहे. (28 मे रोजी जवळपास एका डॉलरला रू. 96 च्या आसपास दर होता) येणाऱ्या काळात त्याने शंभरी गाठली तर आश्चर्य वाटू नये. गेल्या बारा वर्षातील वर्तमान सरकारचे आर्थिक विषया संदर्भातील निर्णय फसले आहेत. येणाऱ्या संकटांची चाहूल घेण्यात सरकार कमी पडले किंवा दुर्लक्ष करण्यात आले. नोटबंदी, जीएसटी किंवा अन्य आर्थिक विकासाला चालना देणारे कार्यक्रम म्हणून ज्याचा गाजावाजा करण्यात आला ते सर्व फेल्युअर ठरले आहेत. निवडणूक जिंकण्याची कला सरकारी पक्षाला गवसली असली तरी राज्य चालवण्याचे कसब दिसून आले नाही हे मान्य करावे लागेल. या स्थितीची चाहूल लागली होती. पण सरकारतर्फे मात्र निवडणूक काळात दुर्लक्ष करण्यात आले. माध्यमातून दडवण्यात आले. आपल्या विदेश नीतीतील काही चुकांचे उमटलेले पडसाद आता नागरिकांना सहन करण्याशिवाय पर्याय नाही. देशांतर्गत वातावरण (धार्मिक द्वेषाची स्थिती, विशिष्ट उद्योगांना सहाय्यक ठरतील असे निर्णय) आणि सरकारी कामकाज पद्धती, आवाजवी हस्तक्षेप उद्योगांना पूरक नसल्याने विदेशी गुंतवणूकदार काढता पाय घेत असल्याचे अर्थविश्लेषकांचे मत आहे. देशांतर्गत बचत रोडावली. केवळ सध्या ज्येष्ठ नागरिक बचत योजनेच्या व्याज दरात कोणताही बदल नाही. इतर सर्व शॉर्ट टर्म बचतींवर व्याजदर बँकांनी कमी केले आहेत. परिस्थितीनुसार नागरिकांना उद्यासाठी काटकसर करण्याशिवाय पर्याय नाही. आता सरकारनेही पारदर्शीपणाने देशातील विरोधी पक्ष आणि नागरिक यांच्यासमोर वस्तुस्थिती मांडावी. पूर्वग्रह टाळून देशातील नामांकित अर्थतज्ञ व्यक्तींची सर्वसमावेशक समिती स्थापन करून पर्याय शोधावेत. जेणेकरून महागाईच्या झळा कमी होऊन विस्कटलेली आर्थिक घडी नीट होऊ शकेल.●●




अनिरुद्ध कांबळे
मो.9922959770

गाईच्या रक्षणार्थ मुस्लिम रस्त्यावर




गेल्या दहा वर्षांपासून भारतात 'गो-रक्षा'च्या नावाखाली मुस्लिम समुदायांवर मोठ्या प्रमाणात हल्ले होत आहेत. जम्मू आणि काश्मीरपासून कर्नाटकपर्यंत आणि पश्चिम बंगालपासून महाराष्ट्रापर्यंत, हल्ल्यांच्या या मालिकेतून काही मोजकीच राज्ये सुटली आहेत. या हल्ल्यांचा परिणाम विशेषतः झारखंड राज्यात जाणवला आहे, जिथे गायींच्या 'रक्षणा'च्या नावाखाली उजव्या विचारसरणीच्या गुंडांनी भीषण हल्ले केले आहेत. लातेहारमधील एका अल्पवयीन मुलाच्या निर्घृण हत्येपासून ते राज्याच्या विविध भागांतील जमावाच्या हल्ल्यांपर्यंत, या राज्याने देशातील काही सर्वात भीषण हल्ले केले आहेत. गायींच्या संरक्षणाच्या नावाखाली दहशतीने मानवी रक्ताचा सडा पडत असला तरी पंजाबमधील दोन मुस्लिम तरुणांनी रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या एका गायीचे प्राण वाचवले आहेत. शमसुद्दीन चौधरी आणि त्यांचा मित्र मुबीन एक गायीसाठी गोरक्षक बनले आहेत. २४ डिसेंबरच्या रात्री शमसुद्दीन चौधरी आणि त्यांचा मित्र मुबीन यांनी एका गायीचा जीव वाचवला. पंजाबमधील मलेरकोटला भागात ही घटना घडली. कोलकाता हाईकोर्टच्या निर्णयाचा हवाला देत मुस्लिम धर्मगुरुनी बकरीईदला गाय कुर्बानी न करण्याचे अपील केले आहे. अनेकदा बकरईद सारख्या सणांच्या वेळी मुस्लिम धर्मगुरूंनी व मौलानांनी स्वतःहून पुढाकार घेत गायीची कुर्बानी न देण्याचे आवाहन केले आहे, फक्त बकरा कुरबान करण्याचे निर्णय घेतला. त्यात देखील सनातनी राजकारण करीत आहेत. मीरा बहिंदर येथे मुस्लिमांनी ईदसाठी बोकड आणला. म्हणून काही धर्मांध तरुणांनी मुस्लिम ज्याचे तोंडास नाव घेत नाहीत. तो डुक्कर आणून त्या विभागात दंगल करण्यात आली. मुस्लिम धर्मगुरू आणि मौलानांनी यांच्या लक्षात आले आहे की गाईच्या नावाने राजकारण करणाऱ्या राज्यकर्त्यांना देशात अराजकता माजविण्यासाठी संधिच द्यायची नाही. कारण बहुतेक हिंदू राजकारणी यांचे गाईची कत्तल करून विदेशात मटण पाठविण्याचे कारखाने आहेत. भारतात गोमांस (बीफ) निर्यातात गुंतलेल्या अनेक मोठ्या कंपन्यांचे मालक हिंदू धर्मीय असल्याच्या चर्चा आणि अहवाल वेळोवेळी समोर आले आहेत. भारत सरकार केवळ 'म्हैशीच्या मांसाचीच' (बफेलो मीट) निर्यात करण्यास परवानगी देते. परंतु आकडेवारीनुसार, देशातील काही सर्वात मोठे मांस निर्यातदार आणि कत्तलखाने चालवणारे उद्योजक हिंदू धर्मीय आहेत. अलीकडे गो शाळा चालविल्या जातात. तर दुसरीकडे गायीची कत्तल करून बफेलो मीट विदेशी पाठविले जात आहे. कित्येक राज्यात निवडणुका जवळ आल्या की गो हत्याचा वाद उकरुन काढून त्यात हिंदू-मुस्लिम वाद निर्माण करून आपली राजकीय पोळी भाजून घेतली जात असते. हे सामान्य माणसांना देखील कळायला लागले आहे. जैसलमेर नगर परिषद कचरा डंपिंग मैदानावर भुके पोटी प्लास्टिक आणि विषारी पदार्थ खाण्याने 700 गाई मारून पडल्या. ही दृश्य भयावह, शर्मनाक आणि गाय माता मान्यताच्या मानवतेला काळिमा फासणारे आहे. ही सरकारी सिस्टीम आणि नगर परिषदची लापरवाही आहे. भुकेल्या, तहानलेल्या 500 गाई तडफडून मरणे. हे कोणाचे पाप आहे? कित्येकवेळा गाईचे मास आहे की नाही याची कोणतीही शहानिशा न करता केवळ सावंश्यवरून कित्येक मुस्लिमांवर अत्याचार झाले. कित्येकांचा बळी घेण्यात आला आहे. ही पशुची मानसिकता कधी बदलणार आहे का नाही? देशासमोर कित्येक जीवन मरणाच्या समस्या असताना संविधान याने दिलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य धर्म आणि संस्कृती स्वातंत्र्य याच्यावर गदा आणून धर्मनिरपेक्ष लोकशाहीला कलंकित केले जात आहे. याची बेकार बेरोजगार तरुण यांना उबग आली आहे. याचा राज्यकर्त्यांनी विचार करण्याची वेळ आली आहे.●●



आनंद म्हस्के
मो. 8652325032

स्वाभिमानाचे स्मरणशिल्प -161

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा हिंगणघाट वर्धा



वर्धा जिल्ह्यातील सर्वात मोठी बाजारपेठ हिंगणघाट येथे आहे. एकेकाळी रिपब्लिकन पक्षाचा बालेकिल्ला होता. दलित पँथर ला मोठे बळ येथेच मिळाले. आंबेडकरी साहित्य संमेलन येथे होतात. या परिसरातील शिक्षण घेतलेल्या मुली मुले यांनी हिंगणघाटचे नाव सर्व दूर नेले आहे. डॉक्टर इंजिनीर, वकील, प्राध्यापक, अधिकारी आणि अनेक शासकीय अधिकारी घडले असा हा भाग आहे. येथे आंबेडकरी चळवळीतील सर्व कार्यक्रम होतात.

संवाद मित्र, राजू थुल
मो. 9423420031

लेखण्यांचा वापर साहित्यिकांना शस्त्रासारखा करावा लागेल : डॉ. प्रा. मनोहर नाईक

संवाद मित्र प्रकाश बावनगडे, नागपूर : वर्तमान स्थिती पाहून 'उत्तर द्यावे लागेल' या कवितासंग्रहाचे कवी माणिक खोब्रागडे हे व्यथित होतात. पण कलावंत वृर्मी जागवण्याचे काम करतो. माणिक खोब्रागडे यांच्या या कवितासंग्रहात काही कविता गेयस्वरुपातील आहेत. अश्या कविता चिरकाल टिकतात. वामनदादांच्या कविता जश्या 'टाटा बाटा' चा उल्लेख करून 'आमचा वाटा कुठं आहे' हे प्रश्न विचारत होत्या, तश्या या कवितासंग्रहातील कविता अनेक प्रश्नांचे उत्तर मागणाऱ्या आहेत. भारतीय संविधान सर्वांच्या हिताचे असताना विद्यमान सरकार जर मनुस्मृतीच्या नियमाने चालण्याचा प्रयत्न करीत असेल तर लेखण्यांचा वापर साहित्यिकांना शस्त्रासारखा करावा लागेल असे आव्हान देणारे विधान डॉ. प्रा. मनोहर नाईक यांनी माणिक खोब्रागडे यांच्या 'उत्तर द्यावे लागेल' या कवितासंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षीय विचार मांडताना केले. मूल्यसंगर साहित्य विचार मंच, नागपूर आणि मूल्यसंगर प्रकाशनच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ कवी माणिक खोब्रागडे लिखित 'उत्तर द्यावे लागेल' या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा अर्पण सभागृह, हिंदी मोरभवन, झांसी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर या ठिकाणी पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. प्रा. मनोहर नाईक आंबेडकरी विचारवंत, मुख्य अतिथी



डॉ. मच्छिंद्र चोरमारे आंबेडकरवादी कवी, डॉ. प्रकाश राठोड आंबेडकरी विचारवंत हे होते. विचारपीठावर कवी माणिक खोब्रागडे, जगदीश राऊत व मूल्यसंगर प्रकाशनचे प्रकाशक हेमंत खोब्रागडे आणि डॉ. ग्रिष्म खोब्रागडे यांची उपस्थिती होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माता रमाई यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. त्यानंतर पाहुण्यांचे शाल व रोपटे देऊन स्वागत केले. याप्रसंगी प्रकाश बावनगडे, अनिता बावनगडे आणि हेमंत खोब्रागडे, प्रीती खोब्रागडे यांच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त शाल, साडी व रोपटे देऊन सत्कार केले. मूल्यसंगर साहित्य विचार मंचच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे खोब्रागडे परिवाराच्यावतीने स्वागत केले. संस्थेचे सल्लागार माणिक खोब्रागडे यांनी प्रास्तविक केले. डॉ. मच्छिंद्र चोरमारे यांनी कवितासंग्रहावर भाष्य करतांना म्हणाले, 'उत्तर द्यावे लागेल' या कवितासंग्रहाचे कवी माणिक खोब्रागडे यांना मी लहानपणापासून ओळखतो. आर्वीला माणिकराव नोकरीला असताना त्यांचे सामाजिक कार्य मी अनुभवले आहे. डॉ. यशवंत मनोहर यांच्यासारख्या दिग्गज कवीची प्रस्तावना 'उत्तर द्यावे लागेल' या कवितासंग्रहाला लाभते. गीतकार माणिक खोब्रागडे, गायक प्रकाश बावनगडे, संगीतकार जगदीश राऊत, कोरस सतीश खरे व जगदीश राऊत रिकार्डिंग स्टार ऑडिओ व्हिडिओ स्टुडिओचे आहे. डॉ. प्रकाश राठोड यांनी कविता संग्रहाच्या मुखपृष्ठावर आणि मलपृष्ठावर भाष्य करताना माणिकरावांची जन्मकुस म्हणजे, काटे आहेत दुःखाच्या पिसाऱ्यातून उगवलेला हा कवी आहे, असे ते म्हणाले. त्यांचा पहिला काव्यसंग्रह 'काट्याने दिले शहाणपण' या संग्रहाला माझी प्रस्तावना आहे, असे सांगितले. अन्वय खोब्रागडे व आरिष खोब्रागडे यांनी याप्रसंगी सुंदर गीत सादर केले. कार्यक्रमाचे सुंदर संचालन प्रा. आत्माराम ढोक यांनी तर आभार प्रा. सुधाकर मेश्राम यांनी केले. कार्यक्रमासाठी संजय गोडघाटे, रंगराज गोस्वामी, प्रकाश बावनगडे, जगदीश राऊत, संजय सायरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला अजय पाटील, अविनाश गोंडाणे, भीमराव गायकवाड, ज्ञानेश्वर गोलाईत, हिवराज दहीवले, दादाराव कापसे, राजेंद्र पाटील, अशोक कांबळे आणि संपूर्ण खोब्रागडे परिवाराची उपस्थिती होती.

आंबेडकरवादी साहित्य संसदतर्फे डॉ. प्रकाश खरात यांना आदरांजली!



नागपूर:- आंबेडकरवादी साहित्य संसद, नागपूर तर्फे बौद्ध संस्कृतीचे अभ्यासक डॉ प्रकाश खरात यांना आदरांजली अर्पण करून सभेला सुरुवात करण्यात आली. डॉ. प्रकाश खरात यांचे शेवटचे भाषण दि. १ मे २०२६ ला बौद्ध जयंतीच्या कार्यक्रमांत दहिपुरा, उंटखाना येथील भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई उद्यानात झाले. कार्यक्रम संपल्यानंतर डॉ. प्रकाश खरात यांना अस्वस्थ वाटू लागले, त्यांना ताबडतोब दवाखान्यात दाखल करण्यात आले. बारा दिवस मृत्युशी झुंज दिली. अखेर १२ मे २०२६ ला त्यांची प्राणज्योत मालवली. आंबेडकरवादी साहित्य संसदेचे मार्गदर्शक व बौद्ध साहित्याचे अभ्यासक डॉ. प्रकाश खरात यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलूंवर प्रकाश टाकून आदरांजली सभा संपन्न झाली. यावेळी आंबेडकरवादी साहित्य संसदेचे अध्यक्ष डॉ. मनोहर नाईक यांच्या अध्यक्षतेखाली आदरांजली सभा घेण्यात आली, यावेळी संसदेचे डॉ. प्रकाश राठोड, प्रसेनजीत गायकवाड, प्रा. ज्योतिक ढाले, प्राचार्य धर्मरक्षित टेंभुर्णे, डॉ. सुशील मेश्राम, डॉ. सर्जेनादित्य मनोहर, प्रा. निलिंद जगताप उपस्थित होते. आदरांजली सभेनंतर आंबेडकरवादी साहित्य संसदेच्या पुढील उपक्रमावर चर्चा करण्यात आली. याबरोबरच २६ जून २०२६ मध्ये राजेश्री शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त संसदेचा कार्यक्रम घेण्यात येणार आहे. त्यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. सभेचे संचालन डॉ. सर्जनादित्य मनोहर यांनी केले, तर

महत्वाचे

निशा खापरे यांना भीमथडी साहित्यगौरव पुरस्कार



नागपूर : अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषद व भीमथडी मराठी साहित्य संमेलन नुकतेच केडगाव चौफुला ता. दौड जि. पुणे येथे संपन्न झाले. या संमेलनामध्ये सामाजिक आणि साहित्यिक योगदानासाठी निशा खापरे यांना भीमथडी साहित्यगौरव पुरस्कार हा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. फ. मु. शिंदे यांच्या हस्ते मानपत्र देऊन प्रदान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे आयोजक दशरथ यादव, महादेव जानकर (राष्ट्रीय अध्यक्ष रा, स, प) आय. बी एन लोकमतचे संपादक मंदार फणसे आणि इतर अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.

पंचकमेटी बुद्ध विहारात मातोश्री रमाबाई स्मृतिदिनी अभिवादन



नागपूर : दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौद्ध महासभा), शाखा शांतीनगर नागपूर आणि पंचकमेटी बुद्ध विहार यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पंचकमेटी बुद्ध विहार येथे त्यागमूर्ती मातोश्री रमाबाई आंबेडकर यांचा स्मृतिदिन श्रद्धापूर्वक साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मातोश्री रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या त्यागमय, संघर्षशील आणि प्रेरणादायी जीवनकार्याचे स्मरण करून कृतज्ञता व्यक्त केली. अभिवादन कार्यक्रमात शिवनाथ नागदिवे, सूर्यभान शेंडे, ज्योती देशभ्रतार आणि डॉ. बीना नगरारे यांनी मार्गदर्शनपर मनोगते व्यक्त केली. वक्त्यांनी माता रमाई यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक क्रांतीच्या कार्यात दिलेल्या मोलाच्या योगदानाचा गौरव करत त्यांच्या त्याग, संयम आणि समर्पणाचा आदर्श समाजाने स्वीकारण्याची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमाला राष्ट्रपाल गजभिये, युवराज मडामे, नायडू रंगारी, महेंद्र सोमकुवर, राजेंद्र पाटील, अनिल कोल्हटकर, प्रमिला मेश्राम, प्रतिभा रंगारी, सुनंदा रंगारी, श्रीमती मेश्राम, निकोसे यांच्यासह अनेक उपासक-उपासिका आणि नागरिक उपस्थित होते.

तक्षशिला बुद्ध विहारात त्यागमूर्ती रमाई यांना अभिवादन



नागपूर : त्याग, समर्पण आणि संघर्षाचे प्रतीक असलेल्या त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या ९१ व्या स्मृतिदिनानिमित्त तक्षशिला बुद्ध विहार येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम तक्षशिला बुद्ध विहार संघचेतना उपासक-उपासिका संघ तसेच मातोश्री रमाबाई भीमराव आंबेडकर सेवा प्रतिष्ठान, विदर्भ प्रदेश यांच्या संयुक्त विद्यमाने २७ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तक्षशिला बुद्ध विहाराचे संस्थापक अध्यक्ष तसेच मातोश्री रमाबाई भीमराव आंबेडकर सेवा प्रतिष्ठान, विदर्भ प्रदेश शाखेचे प्रदेशाध्यक्ष बौद्धाचार्य भगवानजी कांबळे हे होते. यावेळी त्यांनी माता रमाई आंबेडकर आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. प्रसंगी मार्गदर्शन करतांना बौद्धाचार्य भगवानजी कांबळे यांनी माता रमाई यांच्या त्यागमय, संघर्षशील आणि प्रेरणादायी जीवनावर प्रकाश टाकला. उपस्थित उपासक-उपासिकांना रमाई यांच्या आदर्शांचे अनुसरण करून समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाला राजकुमार सुदामे, बंडू ढभारे, सुमित गावंडे, प्रकाश गायधने, प्रकाश धोगंडे, अन्नपूर्णा ढभारे, बेबी शेलारे, खैरकर ताई, काता गावंडे, सुमन देशभर्तार, सत्यभामा मोडक, भगत ताई, निरुपला सुदामे, वर्षा भागे यांच्यासह अनेक उपासक-उपासिका उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन राजकुमार सुदामे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुमित गावंडे यांनी केले. शेवटी सर्वांनी सामूहिकरित्या त्रिशरण आणि पंचशील ग्रहण करून कार्यक्रमाची सांगता केली.

निधन वार्ता

झिबलाबाई डोंगरे

नागपूर : रा. कृष्ण लीला-2 अपार्टमेंट, आदर्श कॉलोनी, साई अकॅडमी जवळ, नारा रोड नागपूर रहिवासी झिबलाबाई डोंगरे वय- 88 वर्ष यांचे शुक्रवार दि. 29 मे 2026 रोजी सकाळी आकास्मित निधन झाले. त्यांचा अंतिम संस्कार आजच सायंकाळी 5.30 वाजता नारा घाट, नारारोड, जरीपटकाला केले.

१२ तासांच्या अखंड कराओके संगीत सोहळ्याने संगीतप्रेमी मंत्रमुग्ध

नागपूर : सीताबर्डी येथील अमृत भवनमध्ये '7 Notes Entertainers'च्या वतीने आयोजित करण्यात आलेला "सारे शिकवे गिले भुला के कहो" या शीर्षकाखालील १२ तासांचा अखंड कराओके संगीत महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. लोकांचे मनोरंजन, संगीताची आवड जोपासणे तसेच हिंदी आणि मराठी संस्कृतीचे संवर्धन हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला संगीतप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाची सुरुवात अविनाश सी. बी. दुपारे यांनी भगवान बुद्धांना समर्पित "प्रथम नमो गौतम" या गीताच्या सादरीकरणाने केली. त्यानंतर भूषण दुपारे यांनी "गौतमा तूच माझ्या गुरूचा गुरू" हे गीत सादर करून उपस्थितांना भावविभोर केले. दिवसभर चाललेल्या या संगीत महोत्सवात हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील जुन्या-नव्या लोकप्रिय गीतांचे सादरीकरण करण्यात आले. राहुल वाहणे यांनी "पहाटे पहाटे मला जाग



आली", समीक्षा पटले यांनी "तू शायर है मैं तेरी शायरी" तर प्रकाश शेंद्रे यांनी "ताने दिन तांदना" या गीतांच्या सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकली. विविध गायकांच्या सुरेल सादरीकरणामुळे संपूर्ण सभागृह संगीतमय वातावरणाने भारावून गेले होते. या कार्यक्रमाला संगीत व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली. यामध्ये माया ढोके, गायिका अल्का लाडे, राजेंद्र चोपडे, संजय अंबाडे तसेच विशेष अतिथी म्हणून संजय जाधव यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे संचालन नंदकिशोर मुळे, स्नेहा जोशी आणि अन्वर यांनी प्रभावी शैलीत केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक अविनाश सी. बी. दुपारे, भूषण दुपारे, राहुल वाहणे आणि त्यांच्या संपूर्ण टीमने परिश्रम घेतले. उत्कृष्ट ध्वनी व्यवस्था, आकर्षक रंगमंच सजावट आणि शिस्तबद्ध नियोजनाबद्दल उपस्थितांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले.

बुद्ध धम्म हा विज्ञाननिष्ठ जीवनमार्ग डॉ. विनोद रंगारी

नागपूर : बुद्ध धम्म म्हणजे तथागत गौतम बुद्धांनी दिलेली विज्ञाननिष्ठ शिकवण आणि दुःखमुक्तीचा मार्ग असून तो सत्यशोधन, कारणमीमांसा आणि निरीक्षण यांना प्रोत्साहन देणारा आहे. बुद्ध धम्म हा पारंपरिक कर्मकांडप्रधान धर्म नसून मानवी कल्याण, नैतिकता आणि समतेवर आधारित जीवनतत्त्वज्ञान आहे, असे प्रतिपादन संशोधक, प्राध्यापक, लेखक व कवी डॉ. विनोद रंगारी यांनी केले.

धम्मसंगोष्टीच्या ३९६ व्या सभेत 'बुद्धिझम आणि विज्ञान' या विषयावर ते मार्गदर्शन करीत होते. यावेळी त्यांनी धम्मचक्रप्रवर्तनसुत्त, सतीपठानसुत्त, रतनसुत्त आदी विविध सुत्तांचे महत्त्व आणि त्यामागील वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्ट केला. तसेच ८४ हजार धम्मस्कंधांची माहिती देत सम्राट अशोकाने त्यांच्या स्मरणार्थ ८४ हजार चैत्य, स्तूप आणि विहारांची निर्मिती केल्याचा ऐतिहासिक संदर्भही त्यांनी मांडला. चार आर्यसत्य, अष्टांगिक मार्ग आणि विपश्यना साधनेच्या विविध अवस्थांचे विवेचन करताना बुद्ध धम्मातील विज्ञानवादी दृष्टिकोन त्यांनी विस्ताराने उलगडून सांगितला. बुद्धांच्या



धम्ममार्गातूनच जगात विज्ञानाचा विकास झाला असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्रिपिटकातील अनावश्यक धारणा बाजूला सारून १९५६ मध्ये विज्ञानवादी धम्माची पुनर्स्थापना केली, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना उपेंद्र कांबडे यांनी तथागत बुद्ध हे जगातील पहिले वैज्ञानिक विचारवंत असल्याचे सांगितले. बुद्धांच्या विज्ञानवादी तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन अनेक संत, महापुरुष आणि वैज्ञानिकांनी विज्ञानवादाचा प्रसार केला, त्यामुळेच बुद्ध धम्माचा जगभर प्रचार व प्रसार झाला, असे त्यांनी म्हटले. माता रमाई आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त धम्मसंगोष्टीचे सक्रिय सभासद राम घोडेस्वार, सुनीता पाटील आणि दादाराव बनसोड यांना आर्थिक सहाय्य देऊन दान पारमितेचे पालन केले. तसेच त्यांच्या उल्लेखनीय आणि प्रेरणादायी कार्याचा गौरव करून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी चंद्रप्रभा आणि माधव मून यांच्या विवाहाच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचा विशेष सत्कार केला. कार्यक्रमाची सुरुवात दादाराव बनसोड यांनी सादर केलेल्या 'गरीबी जरी त्या संसारात होती' या रमाई गीताने झाली. अल्पोपहाराची व्यवस्था नीलकंठ राऊत यांनी सांभाळली. कार्यक्रमाचे संचालन सुनीता रामटेके यांनी केले, तर नूतनदास टेंभूर्णे यांनी आभार मानले. कडक उन्हाचा प्रकोप असतानाही सभेला मोठ्या संख्येने धम्मप्रेमी व मान्यवर उपस्थित होते.

ISTD च्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा दीक्षांत समारंभ उत्साहात



नागपूर : भारतातील अग्रगण्य प्रशिक्षण संस्था Indian Society for Training and Development (ISTD) तर्फे सुरू करण्यात आलेल्या 'प्रशिक्षण, शिक्षण आणि विकास' (Training, Education and Development) या पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा दीक्षांत समारंभ नुकताच नवी दिल्ली येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या भव्य सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सुनिल अब्रोल उपस्थित होते. तसेच अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक परिषदेचे सदस्य आणि नागपूरचे ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. युगल रायलू यांनी विशेष पाहुणे म्हणून उपस्थिती दर्शविली. समारंभात विविध विषयांमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पदके देऊन गौरव करण्यात आला. तसेच संपूर्ण अभ्यासक्रमात अव्वल स्थान पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांनाही विशेष सन्मान प्रदान केले. याशिवाय सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्रे प्रदान केले.

विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमादरम्यान केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे संपूर्ण सभागृहात आनंद, अभिमान आणि प्रेरणेचे वातावरण निर्माण झाले होते. प्रशिक्षण व मानव संसाधन विकास क्षेत्रातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाला चालना देण्याच्या ISTD च्या प्रयत्नांना या कार्यक्रमाने नवी दिशा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

या दीक्षांत समारंभाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करताना त्यांना भविष्यातील व्यावसायिक वाटचालीसाठी प्रेरणा आणि आत्मविश्वास दिला. ISTD च्या या उपक्रमामुळे प्रशिक्षण, शिक्षण आणि विकास क्षेत्रात कुशल मनुष्यबळ निर्माण होण्यास निश्चितच मदत होणार असल्याचे मत यावेळी व्यक्त केले.

लुंबिनी बुद्धविहार तपोवन परिसरात माता रमाई स्मृतीदिनानिमित्त प्रेरणादायी अभिवादन



अमरावती : मातोश्री रमाबाई आंबेडकर यांच्या स्मृतीदिनानिमित्त लुंबिनी बुद्धविहार, तपोवन परिसर येथे भावपूर्ण, प्रबोधनात्मक आणि प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाज परिवर्तनाच्या महान प्रवासात स्वतःचे संपूर्ण आयुष्य अर्पण करणाऱ्या माता रमाई यांच्या त्यागमय जीवनाचे स्मरण करत उपस्थितांनी त्यांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मातोश्री रमाबाई आंबेडकर महिला संघाच्या अध्यक्षा शिवकला गवई या होत्या. प्रमुख वक्त्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या पाली आणि बुद्धिझम विभागाच्या समन्वयक तसेच तक्षशिला महाविद्यालयाच्या पाली विभागप्रमुख डॉ. रेखा पर्वतकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात बुद्धवंदना आणि माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून करण्यात आली. परिसरातील महिला, युवक, ज्येष्ठ उपासक तसेच धम्मप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमात प्रबोधन, कृतज्ञता आणि सामाजिक जाणीवेचा संदेश अधोरेखित झाला. या कार्यक्रमाचे आयोजन मातोश्री रमाबाई आंबेडकर महिला संघ आणि लुंबिनी बुद्धविहार, तपोवन परिसरातील धम्मप्रेमी उपासक-उपासिकांच्या वतीने केले होते.

बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडियाच्या शिबिरात

कर्मचारी हितसंरक्षण, सामाजिक बांधिलकीवर भर

बुलढाणा : बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडिया, जिल्हा कार्यकारिणी शाखा बुलढाणा या नोंदणीकृत कामगार व कर्मचारी ट्रेड युनियनच्या वतीने बुधवार, दि. २७ मे २०२६ रोजी बुलढाणा शहरातील बस स्टँड रोडवरील हॉटेल जिमखाना हॉल येथे एकदिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत पार पडलेल्या या शिबिराला जिल्हाभरातील बहुजन समाजातील कर्मचारी, नोकरदार आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिराचे उद्घाटन बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजकुमार जवादे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या ९१ व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

उद्घाटनपर भाषणात राजकुमार जवादे यांनी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आणि धार्मिक अल्पसंख्याक समाजातील कर्मचाऱ्यांच्या संघटनात्मक एकजुटीचे महत्त्व अधोरेखित केले. कर्मचारी हितसंरक्षण, सामाजिक बांधिलकी आणि संघटित चळवळीची गरज यावर त्यांनी विशेष



भर दिला. "बहुजन समाजातील कर्मचाऱ्यांनी केवळ नोकरीपुरते मर्यादित न राहता सामाजिक प्रश्नांबाबत जागरूक राहून संघटनात्मक बळ वाढविण्यासाठी सक्रिय योगदान दिले पाहिजे," असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी फेडरेशनचे महाराष्ट्र राज्य सचिव व शिबिराचे प्रमुख प्रशिक्षक सिद्धार्थ सुमन यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी कर्मचारी वर्गासमोरील प्रशासकीय अडचणी, सेवा विषयक प्रश्न, संविधानिक अधिकार, संघटनात्मक बांधणी आणि कर्मचारी चळवळीची दिशा याविषयी सविस्तर माहिती दिली. संघटित शक्तीच्या माध्यमातूनच कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडता येतात आणि त्यांचे निराकरण साध्य करता येते, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात भीम आर्मीचे राज्य उपाध्यक्ष सतीश पवार यांनीही उपस्थितांना संबोधित केले. सामाजिक परिवर्तनासाठी संघटनात्मक बळाची आवश्यकता अधोरेखित करतांना त्यांनी सांगितले की, "संघटना मजबूत करणे आणि चळवळ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे. बहुजन समाजातील नोकरदारांनी सामाजिक जाणीव ठेवून समाजाच्या प्रश्नांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला पाहिजे." उपस्थितांनी विविध विषयांवर आपली मते मांडत संघटनेच्या कार्यपद्धतीसंदर्भात महत्त्वपूर्ण सूचना केल्या. संचालन फेडरेशनचे राष्ट्रीय महासचिव परमेश्वर गवई यांनी केले. प्रस्तावना अजयकुमार पडघान यांनी मांडली, तर प्रा. कडुबा पैठणे यांनी आभार प्रदर्शन केले.

त्रिसरण बुद्ध विहारात मातोश्री रमाई व डॉ. माईसाहेब आंबेडकर स्मृतिदिनी अभिवादन



नागपूर : भारतीय बौद्ध महासभा, नागपूर शहर आणि त्रिसरण बुद्ध विहार, बालाजी नगर (विस्तार), भगवान नगर यांच्या संयुक्त विद्यमाने मातोश्री रमाई आंबेडकर व डॉ. माईसाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेचे ज्येष्ठ पदाधिकारी मिलिंद डांगे होते. अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले, "मातोश्री रमाई यांचे कुटुंबवत्सल समर्पण, त्याग आणि संघर्षमय जीवन आजच्या महिलांसाठी प्रेरणादायी आदर्श आहे. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ दिला नाही आणि संसाराची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. तर डॉ. माईसाहेब आंबेडकर यांनी डॉ. बाबासाहेबांच्या उत्तरार्धातील आयुष्यात त्यांच्या प्रकृतीची काळजी घेत मोलाचे सहकार्य केले. प्रमुख वक्ते तथा भारतीय बौद्ध महासभेचे शहर उपाध्यक्ष हरिदास बेलेकर यांनी मातोश्री रमाई यांच्या बालपणापासून ते डॉ. बाबासाहेबांच्या सहवासातील त्यांच्या संघर्ष, त्याग आणि योगदानाचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, रमाई यांच्या निधनानंतर डॉ. माईसाहेब आंबेडकर डॉ. बाबासाहेबांच्या पाठीशी सावलीसारख्या उभ्या राहिल्या. यावेळी शहर सचिव प्रसेनजित गायकवाड यांनी उपवर्गीकरण आणि जनगणना विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी बौद्ध समाजाने जनगणनेत प्रवर्गाच्या रकान्यात अनुसूचित जाती (SC) आणि धर्माच्या रकान्यात 'बौद्ध' अशी अचूक नोंद करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन गौरव रामटेके यांनी केले. प्रास्ताविक कल्याणी झोडापे यांनी तर आभार प्रदर्शन विहाराच्या अध्यक्षा करुणा सोनटक्के यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बकुळा ढोके, प्रभा मुन, करुणा मुन, विशाखा गडपायले, रेखा मोटघरे, माधुरी टेंभुर्णे, रंजना मेश्राम, विजया मडके, आशा फुलपाटील, प्रमिला वासनिक, एस. डी. मुन, शशांक रामटेके, दिगंबर रंगारी, लता मनोहर आणि मंदा गायकवाड यांनी विशेष सहकार्य केले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648